साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ..........०१ ०६
दुसरे खेपेस ..........०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ........ „ 8 as
Single copy ..................

Advertisement.
Below 10 lin ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI — AKOLA MONDAY 5 APRIL 1897 — NO 13
वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ५ माहे एप्रिल सन १८९७ इ० — अंक १३

जाहिरात

### मुंबईं बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मार्गे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

---

आकोलें ता. १२-३-९७

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि. वि. ता. ११ मार्चच्या शुद्धवऱ्हाडी पत्रांत येथील लायब्ररी संबंधानें मजकूर लिहितांना वस्तुस्थितीचा विपर्यास झालासा दिसतो. त्याच्या निरसनार्थ मात्सर्य व आत्मश्लाघा हे दोष ( मंडळी माथे मारण्यास कमी करणार नाहींत हें जाणून) आधीं पदरीं बांधून घेऊन पुढील दोन ओळी लिहून पाठविल्या आहेत . त्यास येत्या अंकीं प्रसिद्धी देण्याची कृपा करावी.

एखाद्या लेखाचें परीक्षण त्याच्या पृष्ठ संख्येवरून केवळ न करितां त्यांतील योग्यायोग्य विचार, माहिती व मुद्यांचें स्पष्ट विवरण यावरून करावयाचें अशी माझी समजूत आहे. तसें जर त्या पत्रकर्त्यांनीं तिऱ्हाईतपणें केलें असतें तर माझ्या लेखास नुसते "लांब लचक" विशेषण देऊन रा. दामले यांच्या रिपोर्टाची त्यास सर्वांशीं तारीफ करिता आली असती व संस्थेचा उत्कर्ष होत आहे असें मोघम ह्मणतां आलें नसतें. माझ्या लेखांत आंकडे व प्रत्यक्ष प्रमाणें दिलीं होतीं. प्रत्येक मुद्याचा विचार करण्यास सभेस वेळ असतां व तसा कोणी आग्रहच धरला असतां तर रिपोर्टाच्या इत्थंभूत चांगलेपणानें अखेरपर्यंत मजल मारलीच असती असें ह्मणण्याचें धाडस ज्याला पाहिजे त्यानें खुशाल करावें.

गुदस्त सालीं बखेडा करून क्रांती घडवून आणण्यांत काहीं मंडळीचा हेतु संस्थे वरील निःसीम प्रेम, संस्थेचे ठराव व नियम यांच्या परिपालनाची अत्युत्कटेच्छा हीं मुळाशीं नव्हतीं सवंग लोकप्रीती व तादृश्य मतानुकुलयता लाभून घेण्याची हातोटी सर्वांस सारखी साधत नाहीं. हें मनांत बाळगून एखाद्या गोष्टीचा अमुक तऱ्हेचा निकाल व्हावा व एखाद्या कामांत हटकून यश येईलच अशी मी कधीं आशा बाळगीत नसतो. येवढेंच मात्र खरें कीं Devotedness, lifelong, unflinching entire, is the secret of every success. However humble good work be fear not to be devoted to it till the end Bear every reverse every discouragement every trial. Let your devotedness be without reproach or question, Success comes very late by very slow approaches nay sometimes after the worker has passed away. But he who practices devotedness handles the liver that is sure to move in the world in the end. हा गुरूमंत्र जपून प्रयत्न करण्यांत कचर खावयाची नाहीं हा दृढ संकल्प धारण केला होता. विचार करण्याचें काम लोकांचें आहे. तो त्यास जेव्हां करावासा वाटेल तेव्हां ते करतील. उच्छृंखळपणा करून मागील सालच्या सभेप्रमाणें बखेडा करून कामास व्यत्यय आणण्याचें माझें ब्रीद नाहीं. तेव्हां रा. दामले यांचा सुंदर रिपोर्ट जसाचा तसाच माझ्या एका कनवाळू मित्राच्या सूचनेनें, इतर मित्रांच्या उदासीनतेनें, कांहींच्या दुराग्रहानें, व कांहींच्या अंधभक्तीनें पसंत झाला याचें भूषण मिरविणारांनीं तें खुशाल मिरवावें.

शुद्धवऱ्हाडी कर्त्यांनीं साल मजकूरचेच आंकडे उतरून घेऊन लायब्ररीचा उत्कर्ष होत आहे असें समाधानपूर्वक ह्मटलें आहे. उत्कर्ष तुलनेनें दाखविला पाहिजे. ती करतानां मागील सालापेक्षां साल मजकुरीं लायब्ररीस उपपदधारी सेक्रेटरी मिळाले ही उत्कर्ष दाखविण्यास फक्त गोष्ट पुरी नसून खालीं लिहिलेल्या गोष्टी ही आणखी कारणीभूत झाल्या पाहिजेतः—

१ देणग्या वगैरे उत्पन्न ज्यास्त व्हावयास पाहिजे.

२ वर्गणीदारांची संख्या वाढली पाहिजे.

३ पुस्तकें ज्यास्त वाचण्यास गेलीं पाहिजेत. व तीं ज्यास्त जणांनीं नेलीं पाहिजेत.

४ वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें ज्यास्त घेण्यांत आलीं पाहिजेत.

५ ज्यास्त पुस्तकें आणविलीं पाहिजेत.

६ दप्तरची व्यवस्था अल्पखर्चानें व अल्पायासानें होण्या जोगी ज्यास्त सुरेख राखली पाहिजे.

७ पुस्तकांच्या व इतर मालमत्तेच्या संरक्षणाची ज्यास्त दक्षता राहिली पाहिजे.

८ नियमांची व ठरावांची अमलबारी ज्यास्त दक्षतेनें व फुरताईनें करण्यांत आली पाहिजे.

९ लोकांच्या गरजा वगैरे सोईकडे ज्यास्त लक्ष देण्यांत आलें पाहिजे.

१० लायब्ररीचे उद्देश सिद्धी करितां ज्यास्त खटपट व्हावयास पाहिजे.

११ नौकर लोकांच्या कामावर व इतर मंडळीच्या वर्तनावर ज्यास्त पैरवी राहिली पाहिजे.

१२ जीं कामें झालीं ती स्वतःच्या प्रेरणेनें त्यांत हां हूं म्हणण्यापेक्षा ज्यास्त कांहीं व्हावयास पाहिजे.

१३ संस्थेच्या उत्कर्षार्थ ज्यास्त नव्या युक्त्या योजिल्या पाहिजेत व उपाय सुचविलें पाहिजेत.

१४ जें काम झालें असेल तें दोषरहित व कोण चें बोट न शिरण्या जोगें झालें पाहिजे.

इत्यादी गोष्टी व्हाव्या लागतात. या गोष्टी पैकीं एखाद्या गोष्टीचे कोणी माहितगार अ.स्तिपक्षी सप्रमाण समर्थन करून देईल तर नुसती उत्कर्षाचीच काय पण अत्युत्कर्षाची स्थिती आपल्या संस्थेस प्राप्त झाली असें समजून या व मागील प्रमादा बद्दल आपली सर्वांची प्रांजळपणानें माफी मागेन. पण पत्रकर्तेराव बुडत्याचा पाय खोलाकडे या प्रमाणें संस्थेच्या अपकर्षा कडे एकंदर कल दिसत असल्या मुळें हें दुसरें लांब लचक चऱ्हाट वळावें लागलें. या पेक्षां सध्याच्या दुर्बल स्थितींत मजकडून अधिक तें काय होऊ शकणार ?

कायमचा कारकून ठेऊन जमा खर्चाची शिस्तवार नोंद ठेवण्यांत आली असें ह्मटलें आहे. कारकून प्रस्तुत कारकीर्दींत ठेवलेला नसून हिशेब घेण्याचें काम त्याजकडून करून घेण्यांत आलें नाहीं व तें तारीखवारहि पण वही पेक्षां ज्यास्त शिस्तवार ठेवलें गेलें नाहीं. इतकेंच नाहीं तर मागील कमेट्यांचे ठराव व तपासणारांचे शक या कडे पूर्ण दुर्लक्ष करून लिहिलें आहे व ते उभ्या वर्षांत म्यानेजींग कमेटी पुढें पसंती करितां ठेवण्याचें धोरण राखलें गेलें नाहीं. जमाखर्चाचा अदाजा म्यानेजींग कमेटी पुढें ठेवण्याचें स्मरण तरी लुब्रे पणानें कोणास द्यावें लागलें तेव्हां ह्या गोष्टी ध्यानांत धरून जमाखर्चाच्या शिस्तीची, संस्थेच्या उत्कर्षाची व चालकांच्या कर्तृत्वाची तारीफ पाहिजे त्यानें पाहिजे तितकी खुशाल करावी.

पूर्वींच्या मंडळींनीं भरपूर द्रव्याश्रय मिळवून भरभराट करून हिशेब असे नमुनेदार अल्पायासाच्या शिस्तीचे ठेविले आहेत कीं त्यांचा कित्ता वळविण्या करितां मुसावल कारंजा जळगांव आकोट येथील मंडळींनीं त्यांच्या नकला नेल्या आहेत. येथील मंडळीस ही आज पावेतों ते पसंत झाले आहेत. सारांश कावीळ झालेल्यास जसें सर्व पिवळें दिसतें तसें वाच्य नें जरा पाठ फिरविल्या बरोबर अलीकडेस कांहीं मंडळीस मागील सर्व वाईट दिसूं लागलें आहे. असो त्यांचा संस्थेच्या उत्कर्षार्थ उपयोग झाल्यास मला समाधानच होणार आहे. कळावें ही विनंती.

आपला
नारायण वामन हरकरे

---

मराठी भाषेवर देशी कवींचा एवढा प्रसाद आहे कीं मराठी भाषेची प्रौढी व उज्वलता महाराष्ट्र कवींच्या अनुग्रहानें चिरस्थायी व कायम झाल्या आहेत. मराठी भाषेच्या उत्कर्षकालीं पद्यात्मक ग्रंथसमूह मोठा झाला पण तोच क्रम गद्यात्मक ग्रंथा विषयीं नव्हता ह्मणून मराठींतील गद्यात्मक ग्रंथ बहुतेक महाराष्ट्र कवींच्या मागून रचण्यांत आले. हल्लीं इंग्रजी भाषेचा प्रसार फार जंगी होत चालला आहे. राज्यकर्त्यांची ती भाषा असल्यामुळें सर्वत्र तिचीच चहा व बहादरी आहे. इंग्रजी भाषेचा प्रसार इतर भाषांस घातुक झाला त्याप्रमाणें मराठी भाषा देखील उत्तरोत्तर मागसत चालली आहे. ही अवनत स्थिती पाहून आपल्या देशी भाषांची भवितव्यता मोठी अशुभकारक वाटते. तसा प्रसंग न येवो अशा आशेवर प्रयत्नश्रीनें कालक्रमणा केली पाहिजे. मराठी कवींच्या प्रासादिक कविता, तिजमधील अलंकार, ईश्वरपरायणता इत्यादि गोष्टींचा रसास्वाद मराठी वाचक घेत असतात परंतु इंग्रजी कवींची विचारसरणी, कल्पनातरंग, सृष्टीसौंदर्यपर निरीक्षण, इत्यादि. गोष्टींची ओळख महाराष्ट्र भाषाभिज्ञांस करून द्यावी या स्तुत्य हेतूनें आमच्या एका सन्मान्य मित्रानें इंग्रजी कवित्व मराठी भाषेच्या मुशींत ओतण्याचा प्रयत्न चालविला आहे. इंग्रजी कवींच्या उत्तम पद्यांतून Golden Treasury [ ह्मणजे सोन्याचा खजिना ] नामक पुस्तकांत निवडक वेंचे संकलित केले आहेत त्या ग्रंथाच्या आधारें आमच्या नूतन कवीनें सन १८९३ साली 'विजया दशमी' च्या मुहुर्तावर इंग्रजी कविनिर्मित सोनें वाटलें. मध्यंतरीं या आरब्ध कार्याचा कांहीं कारणामुळें लोप झाला होता परंतु गत्या वर्षप्रतिपदेच्या मंगल मुहूर्तावर पुन्हा संकल्पित कार्यास आरंभ करण्यांत आला आहे:—

### THE POET'S DREAM

On a Poet's lips I slept
Dreaming like a love-adept
In the sound his breathing kept;
Nor seeks nor finds he mortal blisses,
But feeds on the aerial kisses
Of shapes that haunt Thought's
wildernesses.
He will watch from dawn to gloom
The lake-reflected sun illume
The yellow bees in the ivy-bloom,
Nor heed nor see what things they be—
But from these create he can
Forms more real than living Man,
Nurslings of Immortality !

## कवीचा आभास

कंदर्प-विद्ध-मानस दयिता–गुणसागरीं
जसा पोहे ।
तद्रतिमय तज्जीवित वस्तूंचें अन्य भान
त्या नोहे ॥१॥
कविच्या अधरीं निजलों आभासीं गर्क
तोवि कामुकसा ।
सेवीं विचार-वन-गत दिव्याकृतिरस; न
लुब्ध मर्त्यरसा ॥२॥
कासार-प्रतिबिंबित-दिनकर-कर- दीप्त-पीत-
भृंगकुलें ।
फिरता पाहे दिनभर सहकारी वेष्टिलीं
जणो दुकुलें ॥३॥
भासे कीं तो पाहे लावूनी लक्ष वस्तुसंघ
तदा ।
परि तद्रहस्य शोधी-वस्तु न- कविचेत
अंतरंगीं सदा ॥४॥
अक्षय यथार्थ वस्तू त्यांपासुनि निर्मितो क-
विश्रेष्ठ
अमृताचे पाझर जे, सौख्याचे धांवती जणो
लोट ॥५॥

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती चैत्र शुद्ध ३ शके १८१९

---

लेडी डफरीन फंडाच्या वऱ्हाड शाखेची जनरल सभा गेल्या १३ वे तारखेस भरली होती त्यावेळीं अलिशान रेसिडेंट साहेबाकडून लिहून आलेल्या पत्राचा मुख्यत्वें करून विचार झाला. या पत्राचा मतलब असा होता कीं उमरावतीच्या स्त्रियांच्या दवाखान्या प्रीत्यर्थ सालिना ३३९७ रुपयांची जी देणगी सरकारांतून मिळत असते तिची मुदत पुढील सालच्या १४ वे जानेवारीस संपते; ही देणगी त्या मुदती पुढें देण्याचा सरकारचा विचार नाही. तेव्हां या मधल्या वेळांत लेडी डफरीन फंडाच्या वऱ्हाड शाखेनें आपली व्यवस्था योग्य करून उत्पन्नाची तूट भरून काढावी आणि ही तूट भरून काढण्याचे उपायही योजावे. या पत्रा संबंधानें सभेमध्यें विचार होऊन असें ठरलें कीं या इस्पितळा साठीं स्थानिक सरकार केवढी रक्कम देण्यास तयार आहे याचा खुलासा मागवावा आणि सरकारच्या दृष्टीस ही गोष्ट आणून द्यावी कीं वऱ्हाडांतील इतर धर्मार्थ दवाखान्यांस त्यांच्या खर्चाच्या रक्कमेपैकीं शेंकडा ७० या प्रमाणानें सरकारी देणगी मिळते आणि उमरावतीचा बायकांचा दवाखाना ज्या अर्थी खानगी वर्गण्यांच्या जोरावर उभारण्यांत आला आहे त्या अर्थी दवाखान्याला मदत मिळावी हें अगदीं रास्त आहे. आणि सध्यांच नक्की तूट कळे पर्यंत कांहींच करितां येत नाहीं. सरकारांतून उत्तर आल्या नंतर लेडी डफरीन फंडाच्या सेंट्रल कमिटीला व तसेंच जरूरीच्या मानानें जिल्हा बोर्डास व धर्म-फंड-कमिट्या यांस लिहून अधीक वर्गण्या धाडण्या विषयीं आनररी सेक्रेटरी मि. आरदेसर विनाय हे विनंती करितील. सरकारी पद्धतीच अशी असते कीं मधाचें बोट प्रथम लावावयाचें आणि नंतर आपलें अंग त्या संस्थेंत ठेवून खर्च मात्र युक्तिप्रयुक्तीनें बंद करावयाचा!

---

गोऱ्या फौजेच्या विषयसुखाचीं साधनें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मार्गानें सरकार सज्ज करून देत असे आणि त्या व्यवस्थेनें लष्करी खात्यांत एक रांडाचा बाजारच भरवावा लागत असे पण असें पक्केपणीं आढळून आलें कीं या व्यवस्थेनें गरमी सारख्या रोगांची वृद्धी फार झपाट्यानें होते आणि सर्व प्रकारें अनर्थकारक परिणाम घडतात. या प्रश्नाचा विचार आज पुष्कळ वर्षा पासून चालूं आहे आणि स्टेट सेक्रेटरीनीं आपला अखेरचा जो हुकूम फर्मावला आहे त्याचा सारांश तारेनें असा कळतो कीं हा दुर्गुण ज्या सुळें वाढेल ते उपाय योजू नयेत; सोल्जरासाठीं तरुणी पैदा करण्याची रीत बंद केली पाहिजे, वेश्यांच्या उपभुज्य स्थिती विषयीं परवाने देण्याची मनाई आहे आणि लष्करी छावणीच्या हद्दींत वेश्यांस राहूं द्यावयाचें नाहीं. वरील तत्वें अंमलांत आणण्या विषयीं जरूर वाटल्यास नवीन कायदा देखील करण्याची सूचना करण्यांत आली आहे आणि सोल्जरांची स्थिती चांगली रहावी ह्मणून इंडिया सरकारास असें ही कळविलें आहे कीं सोल्जरांस शिक्षण, कामधंदा व करमणूक हीं पूर्णपणें अनुकूळ करून ठेवावींत ह्मणजे आपोआप कामलीलांचा जोर कमी कमी होईल.

---

दुष्काळानें त्राहि त्राहि करून सोडलें आहे. लोकांचे हाल व उपासमारा हीं डोळ्यानें पाहवत नाहींत. अन्नासाठीं कुटुंबांची व घरादारांची दाणादाण उडाली आहे. शेंकडा २०।२९ लोक देखील सुखी स्थितींत नाहींत. मोठा प्रजासमूह ईश्वरा कडे डोळे लावून दिवस कंठीत आहे. स्वाभाविकपणें हा प्रांत फार उष्ण आहे आणि त्यामुळें दुष्काळाच्या वेदना लोकांस असावर व असह्य आहेत. शेंकडो गणती भिकारी रस्तोरस्तीं फिरत असतात आणि खरोखरच वेळ मोठी कठीण आहे. पोटा साठीं मान सोडला, अब्रू सोडली आणि लोक देशोधडीला लागले ही स्थिती अंगावर शहारे आणिते. जों जों खोल विचार करावा तों तों मन चिंतेनें विव्हल होऊन जातें. हा दुष्काळ परमेश्वरकृपेनें यंदाच संपला तरी किती लोक या ईश्वरी अवकृपेला बळी पडतील याचा नेम नाहीं.

दुष्काळाच्या निवारणार्थ सरकारी तजविजी चालू आहेत. पण त्यांचें परिमाण लोकांच्या गरजांच्या मानानें फार लहान आहे. जेवढीं मोलमजूरीचीं कामें पाहिजेत तेवढीं अद्याप सरकारांतून सुरूं नाहींत. धान्याचे भाव इतके तेज आहेत कीं साधारण मनुष्यांचा या कालांत गुराडाच आहे. प्राण वांचविण्या पूरती देखील मजूरी पुष्कळ लोकांस मिळत नाहीं. त्याचा परिणाम असा होतो कीं किरकोळ धान्याच्या चोऱ्या पुष्कळ वाढल्या आहेत. पोटाची आग मोठी अनिवार्य आहे. आणि तिच्या साठीं सरकारानें सर्वत्र मोलमजूरीचीं कामें फार जलदी चालूं केलीं पाहिजेत. ठिकठिकाणीं नवीन नवीन कामें निघतात परंतु लोकांच्या गर्दीमुळें पुष्कळ जणांस निराशेनें परत पाठवावें लागतें. ही स्थिती लवकर हरतऱ्हेनें टाळली पाहिजे.

२७ फेब्रुवारीच्या सुमारास आकोला, वाशिम व इलिचपूर असे तीन जिल्हे मिळून १०३१८ लोक दुष्काळ कामावर होते. ६ मार्च पर्यंतच्या सप्तकांत ११११ मजूर लोक सरकारी कामावर होते १३ वे मार्चला ही संख्या १२८१८ होऊन २० वे मार्चला १४५२१ झाली. परंतु तीच संख्या २३ मार्चच्या सुमारास २९४२३ झाली. या आंकड्यावरून ही गोष्ट लक्ष्यांत येईल कीं सरकारी कामें पुरेशीं नाहींत. जितकीं कामें निघतील तितक्यांच्या आकारमानानें मजूरदारांची गर्दी तत्काळ होऊन जाईल. सारांश, दुष्काळचीं कामें पुष्कळशीं लवकर निघालीं पाहिजेत.

अनाथगृहें अद्याप पुष्कळच ठिकाणीं नाहींत. त्यांची गरज मोठी आहे. पण पंगु, हातारेकोतारे, अंध, मुलें वगैरे यांची दुःखद स्थिती कोण लक्ष्यांत घेतो ? लोकांची ओरड खरी आहे आणि तिच्या विषयीं बधिरपणा पत्करून निभाव लागणार नाहीं.

स्थानिक सरकार दयालूपणानें प्रजेविषयीं काळजी घेत नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. सरकारची व्यवस्था चालू आहे आणि ती उत्तम आहे पण ही व्यवस्था वस्तुस्थितीच्या मानानें पुरेशी नाहीं. विद्यमान कालाला या पुढें सरकारचा कृपाहस्त फार लांबवर पसरला पाहिजे. या कृपाहस्ताच्या आश्रयाखालीं बहुत मोठ्या प्रजासमूहाचा परामर्ष घेण्यांत आला पाहिजे. आमचें स्थानिक सरकार श्रीमान आहे तेव्हां प्रजारक्षणाच्या सोयीमध्यें काडीमात्र अंतर पडणार नाहीं अशी आह्मास बळकट आशा आहे.

---

सरकारी सारा अगदीं तंतोतंत वसूल होत आला ही आनंदाची गोष्ट होय, तथापि त्या पासून लोकस्थितीच्या उत्तमपणा विषयीं जर कोणी अनुमानें बांधील तर मात्र तीं अयथार्थ व अविश्वसनीय होतील. सरकारचा सारा पटला खरा पण श्रीमान जमीनदारा शिवाय इतर जमीनदार कुळाकडून वसूल होण्यापूर्वीं त्यांनीं आपलीं घरेंदारें सावकाराकडे देऊन किंवा वर्षभराची पिकलेली भाकर विकून, किंवा जवळचा पैसा अडका संपवून सरकारची मागणी भागविली. पण दुष्काळाची पुढील स्थिती शोचनीय आहे. शेतीवाडीची लागवड व कष्टमशागत करण्यास देखील कित्येकापाशीं त्राण नाहीं. तगाईचा पैसा सरकार देत आहे तथापि त्या पेक्षां देखील अधिक सुलभ व सोप्या सोयी लोकांच्या गरजा भागविण्यासाठीं सरकारांतू करण्यांत आल्या पाहिजेत. सरकार काय व्यवस्था करितें हें पाहण्याकडे लोकांचें लक्ष्य लागलें आहे. आमच्या मतें तगाईच्या अटी दूर करून तगाईच्याच तत्वांवर सरकारानें कृपा केली तरच ठीक आहे.

---

इंडियांतील दुष्काळा निमित्त विलायतेंत जो फंड उभारण्यांत आला आहे त्याची रक्कम उत्तरोत्तर वाढत आहे तथापि तिची वाढ पूर्वा पेक्षां कमी जोरानें आहे. हल्लीं १ कोटी वर रक्कम गेली आहे. कलकत्याच्या सेंट्रल कमिटीनें या फंडापैकीं ९१। लक्ष रुपये प्रांतवारीनें वाटून दिले आहेत त्याचा तपशील:–

| प्रांत | रक्कम |
|---|---|
| वायव्य व औंध | १७१८७५० |
| बंगाल | १०९३७५० |
| मुंबई | ८४३७५० |
| मध्यप्रांत | ७८१२५० |
| पंजाब | २१८७५० |
| मद्रास | २१८७५० |
| ब्रह्मदेश | १२५००० |
| नेटिव संस्थानें | १२५००० |
| एकूण | ५१२५००० |

नेटिव संस्थानांस जी रक्कम दिली आहे तिच्या पैकीं २५ हजार रुपये वऱ्हाडाच्या हिश्याला आले आहेत. अर्धा मे महिना झाल्या नंतर पुन्हा आणखी एकवेळ वाटणी होणार आहे. पेरणीचीं धान्यें व शेतीचीं जनावरें हीं विकत घेण्यास शेतकऱ्यास धर्मादायाची तगाई देणार आहेत. परंतु आह्मास अशा रक्कमेनें कार्यभाग होईल असें वाटत नाहीं.

वऱ्हाड प्रांता साठीं मे. कमिशनर साहेबांनीं ४२ हजार रुपये मागितले होते परंतु त्या पैकीं २५ हजारच मिळालेच आहेत. वायव्य प्रांताच्या गरजेच्या मानानें लागणाऱ्या रक्कमेचा १/६ भाग अजून या फंडातून मिळाला नाहीं. दुष्काळाचें स्वरूप फार भयंकर आहे. तेव्हां या फंडाला सरकारानें आपल्या जवळच्या पैशानें भर घातली पाहिजे पण आमचे सरकारास सध्यांच ४ कोटी रुपये कर्ज काढावयाचें आहे त्या अर्थी सरकारची मदत होणार नाहीं. हें उघडच आहे.

या प्रांताचे ४०।४९ लक्ष रुपये शिल्लक आहेत तर त्यांचा उपयोग या प्रांतासाठीं करण्यास काय अडचण आहे हें आह्मांस कळत नाहीं. शिंदे महाराजांच्या खजिन्यांतून १९ लक्ष रुपये बुंदेलखंडांतील संस्थानांस कर्जाऊ देण्यांत येणार आहेत आणि त्याबद्दल शिंदे महाराजांची धन्यता गातात तर निजाम सरकाराकडून ही शिल्लक निदान कर्जाऊ मागून घेण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकारी उत्पन्नें सालोसाल वाढत आहेत तेव्हां हें कर्ज देखील वाढविलेल्या साऱ्याच्या रकमेंतून भागण्या सारखें आहे. इलाज सूचविणें लोकांचें काम आहे पण त्यांचा अंगिकार करणें सरकारच्या मर्जीवर आहे!

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 5 1897

---

Agricultural Education—In these days of dire famine when the number of those dying for want of food is simply apalling throughout the length and breadth of India and when the sons even of the ever fertile soils of Berar form no lucky exception, it is but natural that our thoughts would be directed to the state of Agriculture and Agricultural Education in India.

The subject of Agricultural Education in country—schools was one to which the Famine Commissioners in

their report of 1880 directed the attention of the agricultural department. We are entirely at one with them in holding that no general advance in the agricultural system can be expected until the rural population has been so educated as to enable them to take a practical interest in the agricultural progress and reform. And this can be done only by extending their general education *i. e.* by teaching not only to read, write and cypher, but to use their knowledge so that they may, in however humble a manner, become thinkers, observers and experimenters. The intelligence of the cultivator must be so developed as to lead him to devote a better trained intelligence to his own art and to apply thought, observation and experiment to matters which concern his material wellbeing. He must no longer remain ignorant and wedded to bad and often injurious methods. Some will contend, through false patriotism that Indian culttvator needs little more learning in his art, as India has been from times immemorial been a land of agriculturists. But they must not lose sight of the present extremely degraded condition of the Indian cultivator, his conservatism, and the most important of all things his present poverty and the consequent inability and utter helplessness to introduce any change in the implements or in the manuring of the soil as the result careful observation and experimenting.

We ought to be thankful to our Indian Government that have taken up and pursued the discussion of this question from year to year. Since the report of the Famine commission of 1880 an agricultural conference met Dr. Volecker the delegate of the Secretary of State in 1890. This conference urged an extention of primary education and the combination of agricultural teaching with it and the employment of students agriculturally trained in all departments of Government service where an opening could be made for them. Since 1893 an Agricultural conference meet at Simla each year to consider the same question. The results of these enquiries have been grouped under four heads—[1] Primary Education, (2) Readers and Text books (3) Training School (4) and Higher Education in Agriculture. In Primary schools where instruction is imparted in the vernaculars and in which the boys of the well—to—do classes and the masses are generally on a par instruction should be given so as to train in an early age the habits of observation and thought with the aid of "Object lessons." For this purpose it is intended to insert lessons on "Elementary Science" and "Agriculture ,, in the Readers as has been already done to some extent in the Bombay Presidency. The Government of India also mean to introduce some scheme under which instruction in village maps and land—records should be included in the curriculum of all classes since the knowledge of the system of rural account and cadastral maps will gradually enable the student to become more independent of officials in arranging his own affairs. In advanced classes they intedd to make "Agriculture" at least an *Optional* subject; but this point they leave to the decision of local Governments. (2) As to Readers and Text books dealing with agriculture and allied sciences it is of the the highest importance that they should be simple in arrangement and clear in diction and they should be well illustrated so that the knowledge be served up in a form in which it cad be easily assimilated and digested by the young and that the best intellects in the country should employed on the compilation of these books. We hope to return to this subject in our next issue.

There is limit to every thing. We are glad to see that discussion on the agricultural condition of India has come to an end in some eight important resolutions. We hope that the Government will soon take some action in the light of these resolutions. In connection with the present famine the following paras will be of the greatest use and instruction:—

"The Famine Commission was sent out in 1878 to this country at the instance of Parliament with a mission to enquire "how far it is possible for Government, by its action, to diminish the severity of famines or to place the people in a better condition for enduring them." The Commissioners, after a prolonged tour through India, submitted their report in 1880. They gave prominent consideration to the desirability of extending railways and communications; of enlarging the canal system; and of otherwise expanding the large protective works of the country. They also suggested the measures which should be taken on the actual occurrence of scarcity or famine. But the greater part of their report was occupied with recommendations for the reform of land administration and for the promotion of agricultural improvement. They considered that agricultural prosperity in ordinary times was the best shield against the difficulties and trials of a season of drought, and insisted on the necessity of taking every measure which might, on the one hand, prevent or minimize agricultural loss and distress, or, on the other hand, tend to increase and improve the produce of agricultural land. They advised that for dealing with these matters imperial and provincial departments of agriculture should be established."

"The character of soils and the manures suited to them; the diseases of cattle; the diseases of plants—their causes, and the means by, which they can be prevented, minimized or cured; the extension of irrigation; the effect and value of canal water; the improvement of fuel and focder supplies; the reclamation of waste lands; meteorological phenomena; economic products; improvement of old, and introduction of new, staples and agricultural implements; possible reforms in the methods and practices of cultivation all such subjects as these were to form part of the programme of enquiry."

Captain O. G. Ievers, Assistant Commissioner, left Akola this morning to join his new post at Secunderabad. We are glad of his promotion to the Contonment. Magistrateship. His first appointment in the Berar Commission was at Akola. It was about two years and a half that he has been here as a Magistrate a subordinate judge for some time and also a Taluka officer. He is gentle and courteous. He is straght—forward in his character and his decisions are always impartial. He was kind towards the ryots at large in his revenue circle and was a good famine officer. He was also a capable Vice—chairman of the Akola Municipality.

## वऱ्हाड

हवामान— ऋतुमान अगदीं चमत्कारिक आहे. दिवसा उष्मा विशेष होतो पण रात्रौ थंडीही चांगली पडते. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे पण दुष्काळामुळें लोक फार काळजींत आहेत. गेला दिवस तो सोन्याचा असें पदोपदीं वाटतें.

मि० सी. इ. ब्रिडरफ असिस्टंट कमिशनर शिकंदराबाद यांस आजारिपणाची एक वर्षाची रजा मार्चच्या ३ रे तारखे पासून देण्यांत आली..

शिकंदराबाद छावणीच्या माजिस्त्रेटच्या जागीं क्या० ओ. जी. आयव्हर्स असिस्टंट कमिशनर यांची बढतीवर बदली झाली. कप्तान साहेब सभ्य, सरळ व दयाशील आहेत. दोन वर्षाच्या अनुभवानें हे आपल्या कामांत बरेच दक्ष व चाणाक्ष बनले आहेत.

अकोल्यास क्याप्टन आयव्हर्स यांच्या जागीं मि० अजिजुद्दीन असिस्टंट कमिशनर यांस औरंगाबाद छावणीहून बदलण्यांत आल्यामुळें त्यांची स्वारी येथें येऊन दाखल झाली. वयपरत्वें सद्गुणांस उजळा मिळतो या न्यायानें यांच्या अंगभूत अमोल्य गुणांचा लाभ या पुनरागमनाच्या वेळीं अकोला जिल्ह्यांस फलप्रद होवो असें आम्ही इच्छितों.

येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेली यांस मोठ्या पराकाष्ठेनें आजारीपणाची रजा मिळाली आणि त्यांनीं विलायतेस जाण्य साठीं गेल्या गुरुवारीं मुंबईचा मार्ग धरला. एकदां या स्वारीस रजा मिळाली हें पाहून साहेबांस व लोकांस आनंद वाटला.

त्यांच्या जागीं एलिचपूर येथील सिव्हिल सर्जन डाक्टर शार्भेल यांची नेमणूक अकोल्यास होणार आहे.

सांगवी येथील एका बाजारच्या दिवशीं लक्ष्मण नांवाच्या सराफास दरोडेखोरांनीं लुटून मरणोन्मुख केलें होतें. त्या प्रकरणांतील पांच गुन्हेगार सांपडले असून त्यांची पहिलि चौकशी मि० शामराव अब्याची यांज समोर चालू आहे.

जार्ज ओअर्स नांवाच्या एका तरुण युरेजिअन बांडानें येथील एका बांक क्लार्कचे घरीं चोरी केल्याचे अपराधावरून त्यास मुद्देमालासह नागपूर येथें पकडून येथें आणलें आहे व त्याची चौकशी डेपुटी कमिशनर साहेब यांजकडेस चालू आहे. आरोपीनें आपण युरोपियन ब्रिटिश सबजेक्ट आहोंत अशी तक्रार केली आहे. निकाल अद्याप झाला नाहीं.

अकोला जिल्ह्यांत खालील चीफ कानस्टेबलांच्या बदल्या झाल्या आहेतः—

| मिस्टर | बदलीचें स्थळ. |
|---|---|
| मिरझा इमामबेग | जळगांव |
| रामराव कृष्ण | तेल्हारा |
| बिहारी सिंग | बार्शीटांकळी |
| मेकार्थी | बाळापूर |
| आता उल्लाखान | टाऊन खामगांव- |
| मेकाय | तालुका खामगांव |
| काशिनाथ विश्वनाथ | आकौंटंट पोलिस आफिस |
| अंबिका प्रसाद | तालुका अकोला |

जळगांव मेढ येथील एका वैद्यानें आपल्या धंद्याच्या सोयी करितां कांहीं लोकांस विषप्रयोग करून त्यांस आपल्या उताऱ्याच्या औषधानें बरें केलें परंतु हाच प्रयत्न दुसऱ्या खेपेस फसला आणि १।२ माणसें मेलीं!

याच सुमारास आकोल्यास एक बोहऱ्याचा मुलगा उन्हाच्या झळीनें मरण पावला व दुसरा त्या आजारांतून बचावला. इतक्यांत एक गांवभर गप्प परसली होती बारा वर्षाच्या मुलास विषागी मिठाई देऊन मारण्याचा क्रम कित्येक बैराग्यांनीं चालविला आहे. परंतु ही गप्पच असून खरा प्रकार कांहीं एक नाहीं हें कळविण्यास आनंद वाटतो.

मि. सैफुद्दीनखान लालखान क्लार्क ऑफ कोर्ट यांस उमरावतीच्या डेपुटि कमिशनरचे कचेरीवर बदलण्यांत आलें.

आकोला मुनसिपालिटींतील अधिकाऱ्यांची निवड चालूं वर्षा साठीं गेल्या शुक्रवारच्या जनरल कमिटींत झाली या निवडणुकींतील नेमणुका खाली लिहिल्या प्रमाणें आहेत.:—

| मिस्टर | हुद्दा |
|---|---|
| एफ डब्ल्यू प्रीडो डिपुटी कमिशनर | चेअरमन |
| दामोधर गणेश पटवर्धन वकील | व्हाइसचेअरमन |
| आर. जे० थामसन हेडक्लार्क | ,, |
| शंकर गोविंद वकील | सेक्रेटरी |
| केशव गोविंद दामले वकील | ,, |
| वामन नारायण काळे | कानसरव्हन्सी सुपरिनटेंडट |
| व्हांडरपट, हेडक्लार्क लांड रिकार्ड | पब्लीक वर्कस सुपरीन टेंडट |
| लक्ष्मण गोविंद ओक वकील | गार्डन सुपरीन टेंडट |
| मौलवी हकीमुद्दीन वकील<br>अनंत तात्या कोरडे<br>महमद हुसेन | स्कूल कमिटी |
| जयकृष्ण बगाजी | टाऊनफंड कमिटी |
| गणोबा रावोबा | ग्राउंड रेंट कमिटी |
| लक्ष्मण गोपाळ देशपांडे तहशिलदार<br>लक्ष्मण गोविंद ओक<br>व्हंडरपट | आडिटर्स |
| जयकृष्ण बगाजी<br>सिलिमखा दाऊदखा | सट्टा कमिटी |
| सिलिमखा दाऊदखा | डिसपेन्सरी कमिटी |

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | १०१ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,, ( बनशी ) | १३५ रु० |
| चणे | १२० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ६॥। मण |
| सोनें | २६॥ तोळा |
| चांदी | ८५ |

## वर्तमानसार.

प्लेगच्या कहरामुळें पुण्यास व मुंबईस अनर्थ उसळला आहे गेल्या २६ वे तारखेस पुण्याचे प्रसिद्ध गृहस्थ राव बहादूर चिंतामण नारायण भट बी. ए. एल. एल. बी, स्पेशल जज्ज यांस त्यांच्या वयाचे ५०वे वर्षी प्लेगनें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ कर्ते सुधारक असून स्वभावानें शांत, निःस्पृह व निरुपद्रवी होत यांच्या मृत्यूनें कुटुंबाचें काय पण समाजाचें मोठें नुकसान झालें. परंतु ईश्वरेच्छापुढें इलाज नाहीं.

टर्कीची सत्ता कमी करण्यांत येईल असें वाटतें. पण तें बड्या राजांच्या सल्ल्यानेंच झालें पाहिजे असें इंग्रज प्रधान सांगतात.

ग्रीसची आणखी कांहीं फौज सरहद्दीवर रवाना झाली.

आमचें क्रीट बेट व ग्रीस यांचा एकोपा होईल तरच ऐकूं असें क्रीटच्या बंडखोर प्रजेचें ह्मणणें आहे.

टर्कीचीं लहान मोठीं ८ लढाऊ गलबतें क्रीटवर जाण्यास निघालीं.

एपिरसच्या हद्दींवर गोळागोळी सुरू झाली.

आपलें ह्मणणें थोडें तरी अमलांत येईल ह्मणजे टर्की आपली फौज बेटांतून बाहेर काढील तर आपण आपली फौज बाहेर काढूं असें ग्रीसचें ह्मणणें आहे.

तुह्मी पाहिजे तर क्रीटचें बंदर अडवा पण आह्मी त्यांत पडणार नाहीं असें इंग्लंडानें बड्या राजांस कळविलें.

बेटांतले टर्किश किल्ले बंदोबस्तास अवश्य असल्यामुळें त्यांच्यावर हल्ला करूं नका असें बड्या राजांच्या कामदारांना ग्रीसच्या फौजेस व क्रीटच्या दंगेखोरांस जाहिरनामा लाऊन कळविलें.

टर्कीचें वर्तन रशियांस पसंत असून रशिया ग्रीसला मदत करण्यास तयार नाहीं असें सांगतात.

व्हॉलेंटियर व दारूगोळा भरून ग्रीसची एक आगबोट क्रीट बेटांत जात असतां आस्त्रियानें पकडली.

अमेरिकेंतील मिसिसिपि नदीस महापूर आला. दोन्ही अंगास ४०।४० मैल पाणीच पाणी झालें. पुष्कळ माणसें मेलीं व नुकसानही फार झालें.

येकन येथें १०० अर्मेनियन लोकांची पुन्हा कत्तल झाली.

सय्यद अली हसन हे निझामचे हिशेबी सेक्रेटरी झाले.

हिंदुस्थान व सिलोन (रावणाची लंका) यांच्या दरम्यान खुषकीचा रस्ता आगगाडी करण्याचा विचार पुन्हा निघाला आहे रावणाच्यावधासाठीं रामानें मारुतीस सांगून तावडतोब सेतु बांधून रस्ता केला व तो रस्ता करण्यांत मारुतीनें, बोटांनें उकरी समुळ शिखरीं काढि क्षणाभितरी । पुच्छें लक्षवरी शतद्वयकरी सहा लक्ष ठेवी शिरीं ॥ रोमेरोम गिरि करीं उतरडी वेगें उडे अंबरीं । ऐसा वानर केसरी प्रतिदिनी पन्नास खेपा करी ॥ असें करून तो सेतु बांधला आणि मग, वाली निर्दलनं समुद्र तरणं लंकापुरी दाहनं । पश्चाद् रावणकुंभकर्णहननम असें केलें. आज इंग्रजांनीं पायवाट केली ह्मणजे तसें कांहीं व्हावयाचें नाहीं आहे!

येत्या चैत्र व० ३० शनिवार
ता. १ मे सन १८९७ रोजीं येणारा
येत्या चैत्र व० ३० शनिवार ता० १
मे सन १८९७ रोजीं येणारा
कुयोग

यदि भवति कदाचिच्चाश्विनी नष्टचंद्रा।
शनि रवि कुजवारे स्वातिरायुष्य यागे ॥
गगनचर पशूना जंगम स्थावराणाम् ।
नृपति जन विनाशो राज्यभंगस्तूचोक्तः ॥१॥

कदाचित् शनी, रवी, भौम, या वारीं अमावास्येस आश्विनी किंवा स्वाती नक्षत्र आणि आयुष्मान योग असा याग आला तर पशु, पक्षी, जंगम, स्थावर व राजे जन यांचा नाश आणि राज्यभंग होईल.

आर्धींच या दुर्मुख संवत्सरानें आह्मां हिंदुस्थानवासी लोकांस त्राहि त्राहि करून सोडलें आहेच व पुढें येणाऱ्या हेमलंबी संवत्सरांतील एकंदर योग पाहता गेलेलें दुर्मुख संवत्सरच बरें गेलें असें ह्मणावें लागेल, असें वाटतें. येत्या चैत्र वद्य अमावास्येस वरील 'भयंकर योग' आहे. ईश्वरी इच्छेपुढें मानवी प्रयत्नाचें कांहीं चालत नाहीं तरी सर्वांनीं स्वधर्माप्रमाणें परमात्म्यावर श्रद्धा ठेऊन त्याचें अनन्य चिंतन करीत जाणें.

फ्रान्स व जर्मनी येथें बटाटे फार तयार करितात. फ्रान्स मध्यें ३३४२९०० एकरांत बटाटे लाविले आहेत व जर्मनिमध्यें ७६९२१६९ एकरांत बटाटे लाविले आहेत.

अ० द०

दापोली, पालघर, येथेंही प्लेग सुरू आहे.

बिलासपूर जिल्ह्यांत पटकीचा आजार सुरूं झाला आहे.

होटगी येथील इस्पितळास आग लागली. मुद्दाम या चालू रोगा करितां बांधले होतें.

मुंबई येथील चवथ्या पायदळ पलटणींतील शीख लोकांऐवजी राठोर रजपुतांची भरती करावी असा हुकुम सुटला आहे.

तारा:-डिफर्ड तारा आजपर्यंत पोस्ट मार्फत पोहोंचविण्यांत येत होत्या त्या येत्या पहिले तारिखेपासून मनुष्याबरोबर पोहोंचत्या कराव्या असें इंडिया सरकारानें ठरविलें आहे.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं सरतेशेवटीं आनरेबल मि. सुरेंद्रनाथ बानर्जी हे वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां, इंग्लंडास जाणार आहेत. आ० साहेब एप्रिलच्या १० व्या तारखेस मुंबई सोडतील. आह्मी अशी आशा करितों कीं, साहेब; मजकूर इंग्लंडांत वेळेवर हजर होतील.

क्रीट प्रकरण:-हें प्रकरण आतां बरेंच जोरावलेलें दिसतें. युरोपियन राष्ट्रांचे मत ग्रीसनें क्रीट सोडून तें बेट स्वतंत्र व्हावें असें आहे. पण रशिया टर्कीला चाल करण्यांस उत्तेजन देत आहे यावरून लढाई जुंपेल असा अदमास आहे. क्रीटच्या संबंधानें ग्रीस आपला हेका सोडीत नसले कारणानें इंग्लंड, रशिया, जर्मनी, आस्ट्रिया आणि फ्रेंच इ० राष्ट्रांच्या आरमारांनीं नाळी रोखल्या आहेत,

इं० प्र०

गुरांस चारा-नासिक जिल्ह्यांतील जंगलांतला अंजनाचा पाला गुरांकरतां मोफत घेण्यास सरकारानें परवानगी दिली. तळेगांव ता. इगतपुरी येथें ७३ हजार पौंड; कचुर्ली ता नासिक १६ हजार पौंड; ननासी ता. दिंडोरी ८४०६० पौंड; व कळवण येथें २०९३८ एक द्विवितीयांश पौंड गवत गुरांकरितां जमा करून ठेविलें आहे.

गोदावरी व्हॅली रेलवेचें काम मोंगलाई हद्दींत येवल्यापासून १४ मैलांवर चालू झालें आहे. इंग्रजी हद्दींतील जमिनीच्या कांपनसेशनचा निकाल झाल्यावर मनमाड जंगशन केलें जाईल.

एकंदर हिंदुस्थानांत दारिद्र्य गृहांत ९॥ लाख लोक जेवताहेत.

२७ कोट साऱ्यांपैकी १२ कोट रुपये तर वसूल झाला आहे. तहकूब किती रहातो पहावें.

आ० व०

सरकारानें स्वतंत्र प्लेग कमिटी नेमण्यापूर्वीं आपल्यास नुस्ते विचारलेंही नाहीं. ह्मणून कराची येथील म्युनिसिपालिटीच्या एकंदर नेटिव व युरोपियन मेंबरांनीं राजीनामे दिले. परंतु मागाहून त्यांची नीट समजूत पडली.

दुष्काळप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारास ६ कोट रुपये खर्च येईल असा अदमास आहे.

पंचगणी जवळ भिलार नांवाचे खेड्यास आग लागून सवे गांव जळालें. पुष्कळ जनावरें मेलीं व लोकांस घरें नाहींशीं झालीं.

सुरत येथें मुसलमानांचीं थडगीं व दर्गे यांना चुना देण्याचा हुकूम निघाल्या कारणानें ते लोक फार खवळून गेले असून त्यांना दाबामध्यें राखण्यासाठीं अधिकारी सुद्धां शहरांत लष्करी लोक फिरवीत आहेत.

क० त०

गेल्या महिन्याच्या २८ व्या तारखेस म्यांचेस्टर येथें हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीसंबंधानें विचार करण्याकरितां तेथील लोकांची एक जाहीरसभा भरली होती. अध्यक्षाचे जागीं नामदार दादाभाई नवरोजी यांची योजना झाली होती. त्याप्रसंगीं त्यांनीं व मि. हाइंडमन यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानाशी असलेल्या इंग्लंडच्या संबंधा विषयीं चांगलें खरमरीत भाषण केलें होतें व शेवटीं सर्वानुमतें असें ठरविण्यांत आलें कीं, हिंदुस्थानापासून एक कोटी सत्तर लक्ष पौंड ह्मणजे सत्तावीस कोट रुपये वसूल होण्याचा जो अंदाज लॉर्ड जार्ज ह्यामिल्टन यानें केला आहे; तो अशा दुर्धर प्रसंगीं म्यांचेस्टरच्या व्यापारी लोकांनीं हिंदुस्थानच्या लोकांस सोडून द्यावा आणि ही इतकी मदत मिळाली असता हिंदुस्थानच्या लोकांस पुष्कळ साधन होईल अशाबद्दल म्यांचेस्टरच्या लोकांस विनंती करावी हें सभेनें बजाविलेलें आपलें काम फारच समाधान मानण्या सारखें आहे, परंतु ह्या ठरावाचा कितपत उपयोग होईल तें सांगवत नाहीं. सध्यांतर तो आह्मास मृगजलाप्रमाणें नुसती आशा उत्पन्न करणारच आहे.

स० वि०

टोपीवाल्याचा सर्व जगाशी व्यापार चालतो. तो सर्व जगाला लोखंड, कोळसा व इतर पदार्थ पुरवितो इतकेंच नाहीं, तर अमेरिका व इजिप्त देशांत जातो, तेथला कापूस घेऊन येतो. त्याचें कापड करून आपल्या व इतर देशांस पुरवितो. रशिया व हालंड या देशांतून ताग, आणतो, दक्षिण अमेरिकेंतून कातडीं आणतो. आस्ट्रेलियांतून लोंकर आणतो व त्या सर्वांचा उत्तम माल बनवून परदेशीयांस देतो.

टोपीवाला दरसाल ९७,८०००,००० रुपयांचा कापूस ३००० मैलांवरून आणून त्यावर हजारों पुरुष व स्त्रिया कामास लाऊन त्याचे लाखों निरनिराळ्या तऱ्हेचें कपडे करून आपल्या देशांतील लोकांस पुरवितो, इतकेंच नाहीं, तर १०८,८९,००,००० रुपयांचें सुती कापड, सूत व शिवायचा दोरा बाहेरदेशीं पाठवितो. असें ३० वर्षांत बाहेरदेशीं जाणारें कापड एकापुढें एक जोडीत गेलें, तर सूर्यापर्यंत जाऊन पोहोंचेल!

टोपीवाला फक्त हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारचें तलम सुती कापड १,८९००,००,००० यार्ड पाठवितो; दक्षिण अमेरिकेंत ८८,००,००,००० यार्ड, चीन देशांत ४९००,००,००० यार्ड, टर्कींत ३४,००,००,००० यार्ड पाठवितो. याशिवाय जाडें भरडें कापड जातें तें निराळेंच. शिवायचा दोराच २७,२०,००० रुपये किंमतीचा बाहेर जातो. ऑस्ट्रेलियांतील झाडींत, दक्षिण अमेरिकेंतील मैदानांत, स्पेन देशांतील द्राक्षाच्या बागेंत, आफ्रिकेंतील नदीच्या कांठीं, कोठेंही जरी मनुष्य कांहीं शिवताना दृष्टीस पडला, तर ती सुई व दोरा दोनही टोपीवाल्याच्या देशांतील ह्मणून समजावीं!

टोपीवाल्याच्या लोंकरीचा व्यापार तर याहीपेक्षां मोठा चालतो. हिंदुस्थानांत सुती कापड फार खपतें, तर लोंकरीचें कापड संयुक्त संस्थानांत (अमेरिका) फार खपतें, त्याबद्दल दरसाल १२,२४,००,००० रुपये टोपीवाल्याला मिळतात. लोंकरी कापडाचें दरसालचें टोपीवाल्याचें उत्पन्न ४१,७६,९०,००० रुपये आहे! याशिवाय आयतें कोट, विजारी, सदरे वगैरेबद्दल १०,०३,००,००० रुपये दरसाल मिळतात. ह्मणजे सर्व तऱ्हेचें कापड वगैरे इतकें तयार होतें कीं, टोपीवाल्यांचे देशांत खपून जें बाकीचें बाहेर देशांत जातें, त्याबद्दल त्याला दरसाल १,७६,८०,००,००० रुपये मिळतात! इतकें उत्पन्न पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि देशाला नाहीं.

टोपीवाल्याची व्यापाराच्या कामांत जी इतकी सरशी आहे त्याचें कारण असें आहे कीं कोणत्याही देशांत कोणतीही जिन्नस दृष्टीस पडो, किंवा पृथ्वीच्या पोटांत आहे असें त्याला कळो, कीं तो त्यानें तेथून काढलाच व त्यावर मेहनत करून त्याला सुरेखसें रूप देऊन त्याला जगाच्या बाजारांत आणून त्यावर पैसे मिळविलेच! अमुक एक जिन्नस अमक्या देशांत चांगला तयार होतो असें याला समजलें, कीं हा लागला त्याच्या पाठीस! आपल्या देशांत तो तयार करण्याबद्दल त्याची खटपट सुरू झालीच!

क०

कोणी एक दारूबाज राजश्री एके दिवशी खूप दारू पिऊन रस्त्यांत तोंड उघडें ठेवून पडला होता. इतक्यांत एक कुत्रा तेथून जात होता त्यानें या राजश्रींचें उघडें तोंड हुंगून आपल्या नैसर्गिक कर्मा प्रमाणें एक तंगडी वर करून त्याच्या उघड्या तोंडांत लघवीचा विधी केला. तेव्हां या राजेश्रीच्या तोंडांत कुत्र्याचें तें समुद्र जल पडलें तेव्हां ही स्वारी ह्मणूं लागली कीं अरे मी नको नको ह्मणत असता मला आग्रह करून आणखी दारू कशाला पाजतां?

दी०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ८

किरकोळ अंकास.......................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस .........८। ८६

दुसरे खेपेस ..........८।

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as

Six monthly......... 3 ..........,, 8 as

Single copy ............... .........

Advertisement.

Below 10 lines ... 2 R

Per line over 10 ... 4 as

Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 12 APRIL 1897 | NO 14

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख १२ माहे एप्रील सन १८९७ इ० | अंक १४



## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोंन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent


---

पुसद ता० ४।४।९७

उष्णतेचें मान दिवसें दिवस वाढत्या प्रमाणावर आहे. मधून मधून अभ्रें आल्यामुळें तर फारच उकडतें. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं तरी कापशी देवी व देवी यांची साथ गांवांत आहे. गांवची स्वच्छता व आरोग्याचे इतर उपाय वेळींच अधिकाऱ्यां कडून योजिले जातात. ह्या सर्व गोष्टी येथील अनुभविक व मेहनती तहसीलदार मि. त्रिंबूजी नारायण यांच्या दक्षते मुळें होतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

रिलिफ वर्क—सहा सात कोसांवर शिलोना घाटाचे कामावर बरेच गोरगरिब लागून निर्वाह करित आहेत. व फ्यामिन कोडा अन्वयें त्यांची सर्व व्यवस्था ठेविली जात आहे. आणखीही कांहीं ठिकाणीं कामें सुरू होणार ह्मणून ऐकतों. कोणतेही प्रकारें गरीब लोकांचे प्राणांचें रक्षण होणें इष्ट आहे. अनाथगृह सुरू होण्याची खटपट चालू आहे व तें अनाथ लोक जमल्या बरोबर सुरू होईल.

येऊन गेले—मे० एजुक्याशनल इनस्पेकटर साहेब ( मि० महाजनी ) यांची स्वारी मंगरूळ मार्गे येथें ता ३०।३।९७ रोजीं येऊन शाळांची तपासणी करून तालूक्यांतील इतर शाळा पाहण्यास गेली.

भयंकर खून—गेल्या ता. २९ चे रात्रीं येथील टाऊन पोलीसचे जमादार, कानस्टेबल व चौकीदार शहरांत गस्त फिरत असतां एके कोपऱ्यांत कांहीं हालचाल दिसली. पाहतात तों कांहीं चोरटे दत्रा धरून बसले आहेत. त्यांनीं जबाब न दिल्यामुळें जमादार हे त्यांजवर धांवून गेले तों चोरट्यांनीं त्यांचे मस्तकावर जोरानें काठी मारली त्या सरशी डोकें फुटून जमादार निचेष्ट पडला व दोन दिवसांनीं बिचारा प्राणास मुकला. सदर्हू जमादार सर्वांशीं फार सभ्यपणानें वागत असे व आपले कर्तव्याचे वेळीं जिवा कडेस सुद्धां पहात नसे त्याचा असा परिणाम झाला हें पाहून सर्वांस हळहळ वाटत आहे. त्यांचे मागें त्याचा एकूलता एक १३।१४ वर्षांचा मुलगा व बायको असून त्यांस निर्वाहाचें साधन मुळींच नाहीं. खात्याचे अधिकारी या गोष्टीचा पूर्ण विचार करतील अशीं सर्वांस उमेद आहे.

---

THE ROVER

‘ A weary lot is thine, fair maid,
A weary lot is thine !
To pull the thorn thy brow to braid,
And press the rue for wine.
A lightsome eye, a soldier's mien,
A feather of the blue,
A doublet of the Lincoln green—
No more of me you knew
My Love !
No more of me you knew.
‘ The morn is merry June, I trow,
The rose is budding fair;
But she shall bloom in winter snow
Ere we two meet again. ’
He turn'd his charger as he spake,
Upon the river shore,
He gave the bridle—reins a shake,
Said ‘ Adieu for evermore
My Love !
And adieu for evermore.

पद

क्लेशद जीवित फार । सखे तव क्लेशद जीवित फार ॥ ध्रु० ॥
सुवर्ण भूषण सांडुनि घालिसि । कंठी तुलसी हार । भाली चंदन तिलक विराजे । शिरीं जटांचा भार ॥१॥ क्लेशद० ॥
प्रसन्न मुद्रा शिलेदारिचा । झोक नोक दिलदार । तुरा पिसांचा पाहुनि मस्तकिं भुलालिस तूं अनिवार ॥२॥ क्लेशद० ॥
पेहराव जरीचा माझे नेत्रहि । चंचल पाणीदार । यांविण तुजला अन्य न ठावें । स्वीय मनास विचार ॥३॥ क्लेशद० ॥
वसंत समयीं फुलला सखये । मदन बाण गुलजार । शरदिं जायें तो फुलेल अपुली । भेट पुन्हा साचार॥४॥ क्लेशद०॥
ऐसें बोलोनि वाजी फिरवी । झडकरि तो झुंजार । ‘येतों सखये ! निरोप माझा । शेवटला स्वीकार ॥५॥ क्लेशद० ॥

---

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १० शके १८१९

---

चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआ यांच्या कारकिर्दीचा एक संक्षिप्त वृतान्त सर रिचर्ड टेंपल यांनीं मुंबईच्या टाईम्स ‘वर्तमान पत्रा करिता लिहिण्याचें योजिलें आहे प्रथम उपोद्घातांत ते लिहितात कीं १८३७ पासून १८९७ पर्यंत साठ वर्षें महाराणी सरकारच्या कारकिर्दीला होत आली एवढी मोठी कारकीर्द ब्रिटिश इतिहासांत कोणाचीच नाहीं. भयंकर घडामोडी, बुद्धी व नीती यांचा विकास, दर्यावर्दी वर्चस्व, राज्यवृद्धी इत्यादि गोष्टींत इलिझाबेथ किंवा जार्ज ३ रा यांच्याशीं तुलना केली तर व्हिक्टोरिआच्या कारकिर्दी विषयी मतभेद पडेल. परंतु पुष्कळ बाबतींत या कारकीर्दीला देखील कांहीं वैभवशाली विलक्षणपणा आला आहे. धनसमृद्धी, शास्त्रीय शोध, आधिभौतिक संपात्ति, भांडवलाचा संचय व उद्योगधंद्याचें प्राबल्य या गोष्टींत हें राज्य अद्वितीय आहे. ब्रिटिश राज्या संबंधानें दोन विशेष गोष्टी या कारकिर्दींत घडल्या त्या अशाः—पहिली, ब्रिटिश राज्य विस्तृत झालें; दुसरी, ब्रिटिश लोकांच्या जीविकेला हा विस्तार जरूरीचा झाला आहे. परंतु अलिकडे हा राज्यविस्तार अत्यंत आवश्यक झाला आहे व उत्तरोत्तर आवश्यकता अधिकाधीक होत आहे.

ग्रेट ब्रिटन बेटाची सांपत्तिक स्थिती सध्यां अप्रतिम आहे. जगभर व्यापार फैलावला, खनिज द्रव्यें हस्तंगत झालीं, गिरणीची कारागिरी विलक्षण साधली, आणि राष्ट्रीय कल सारखा उद्योगपर आहे या मुळें लोक वस्ती अतिशय दाट झाली आहे. अशा लोक संस्थेची निव्वळ शारिरिक शक्तीच अगोदर भरपूर आहे; आणि यांत्रिक कलेनें व शास्त्रीय शोधानें ही शक्ती बहुगुणीत केली आहे. अर्थात लोक आपल्या कारागिरीच्या इतक्या वस्तु उत्पन्न करितात कीं त्या त्यांच्या स्वतांच्या जरूरीपेक्षां पुष्कळच होतात. जर या वस्तूंचा परराष्ट्रीं खप झाला नाहीं तर या ऊत आलेल्या लोकवस्तीलां उद्योग नाहींसा होईल. ब्रिटिश राज्य विस्तृत आहे ह्मणून हा उद्योगधंदा मिळतो. पण गिरणींच्या भागांत व मुख्य मुख्य व्यापाराच्या शहरांत लोकसंख्या इतकी कधीं नव्हती व अशी कोठें पहाण्यांतही नाहीं. शहरों शहरीं वस्तीला आले त्या लोकांची संख्या खेडेगांवातल्यापेक्षां फार मोठी आहे; सुमारें सर्व लोकसंख्येच्या पैकीं निम्मी लोकसंख्या शहरच्या वस्तींत येईल, आणि लांब काळ लोटण्यापूर्वींच ही लोकसंख्या $\frac{२}{३}$ होईल. उत्तरोत्तर अन्नधान्योच पेरे फार कमी कमी होत आहेत आणि त्याचा परिणाम असा घडला आहे कीं, निम्म्यापेक्षां अधिक धान्याचा पुरवठा बाह्य राष्ट्रांतून व्हावा लागतो आणि याशिवाय नाना उदरनिर्वाहाच्या वस्तू तशाच बाहेरून आणवाव्या लागतात. या प्रकारें आयात मालाची सालीना किंमत ४९ कोट पौंडापर्यंत होते.

असा विलक्षण व प्रचंड आयात मालाचा व्यापार पूर्वीं कोठेंच कधीं घडला नाहीं. ग्रेट ब्रिटन मध्यें हा प्रचंड आयात माल येतो याचा मोबदला नानाविध प्रकारांना दिला जातो. ग्रेट ब्रिटननें दुसऱ्या राष्ट्रांस भांडवलाच्या रूपानें २ पासून ३ अब्जापर्यंत मोठमोठ्या रकमा व्यापारासाठीं दिल्या आहेत. त्यावरील फक्त व्याज ग्रेट ब्रिटनाला मिळते आणि बाकींचा फायदा आयात मालाच्या मोबदल्यांत दुसऱ्या राष्ट्रांस मिळतो. जगांतील अर्धीं गलबतें इंग्लंडच्या मालकीचीं आहेत आणि त्यामुळें दर्यावरील मोठा व्यापार इंग्लंडच चालविते व भाड्याच्या रूपानें पुष्कळ पैसा कमविते. हा पैसा आयात मालाची किंमत देतांना उपयोगी पडतो. परंतु या किंवा अशा प्रकारच्या साधनांनीं इंग्लंडच्या गरजा भागत नाहींत. मुख्य साधनें ह्मणजे विलायती मालाच्या राशी वगैरे यांची परराष्ट्राला रवानगी होय. ग्रेट ब्रिटन बेटांतून सालिना २२ $\frac{१}{२}$ कोट पौंडाचा माल द्वीपान्तरावर जातो आणि असाच क्रम चालू आहे. आणि हा निर्यात मालाचा व्यापार युरोप, अमेरिका व स्वतंत्र राज्यव्यवस्थेच्या ब्रिटिश कालनी या मधून अप्रतिबंध चालेल तर तो याही पेक्षां फार मोठा विस्तृत होईल. परंतु युरोप, अमेरिका, व ब्रिटिश कालनी यांमधून आयात मालावर जकातीचा कर बसविल्यामुळें या निर्यात व्यापाराला धक्का पोचला आहे आणि त्यामुळें ब्रिटिश कारागिरीचा माल त्या त्या द्विपीं फारसा जात नाहीं. ब्रिटिश राष्ट्राप्रमाणें इतर राष्ट्राला देखील हा जकातीचा कायदा लागू पडतो पण तो विशेषें करून ब्रिटिश राष्ट्राविरुद्ध फार जातो. ब्रिटिश माल किंमतीच्या मानानें फायदेशीर पडतो आणि सहजींच त्याचा प्रवेश प्रत्येक राष्ट्रांत होऊन तेथील स्थानिक व्यापार ठार बुडतो ह्मणून या गोष्टीला आयात मालावर जकात बसविण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं अशी सार्वत्रिक समजूत आहे. जीं राष्ट्रें अशी जकात बसवितात तीं ब्रिटिश व्यापाराचें वर्चस्व कबूलच करितात. बहुतेक यंत्राचे कारखाने चालविणारीं राष्ट्रें ही जकात बसवितात आणि असें निदर्शनास आणितात कीं ग्रेट ब्रिटन बरोबर कोणत्याही राष्ट्राशा टक्कर देववत नाहीं. या प्रमाणें सर्व गिरणीवालीं राष्ट्रें ग्रेटब्रिटनचें वर्चस्व सर्वानुमतें कबूल करितात. प्रत्येक देशाभिमानी ब्रिटनाच्या मनांत या विचारा विषयीं योग्य अभिमान वाटेल परंतु त्या बरोबरच दुसऱ्या अत्यंत विचारणीय गोष्टी मनापुढें उभ्या राहतात.

गेल्या सोमवारा पर्यंत इंडियांतील दुष्काळा निमित्त जो धर्मादाय फंड उभारण्यांत आला आहेत त्याचे आंकडे निरनिराळ्या देशासंबंधानें स्मरणांत ठेवण्यासारखे आहेतः—

| राष्ट्र | रुपेय आ. पै |
| --- | --- |
| शुद्ध इंडिया | ५६५२२९--१४—५ |
| ग्रेट ब्रिटन | ८७२४००४—४—१ |
| कानडा | ४००००० |
| चीन | १२०१०९ |
| स्ट्रेट सेंटलमेंट | ६३५८० |
| आस्ट्रेलिआ | ६२३९३--१०—! |
| जपान | २९५०० |
| जर्मनी | ३९१ |
| इटली | १३० |
| स्वीडन | ९६४—५—९ |
| सिलोन | ५५७३-:२—२ |
| डेमेरारा | ३६४-१२—० |
| पालेस्टाईन | ६००-१३—३ |
| जिब्राल्टर | ७८६८-१३—७ |
| दक्षिण आफ्रिका | १२६४१--१५—७ |

एकूण १,०००,६४१६-९-१०

या शिवाय इंडियांत प्रत्येक इलाख्यांतून विशेष वर्गण्या जमविल्या आहेत त्यांची एकूण रक्कम रुपये १०७१८४०२-११ आणे १ पै आहे.

इंडियांतील लोकवस्तीच्या मानानें व दुष्काळाच्या मानानें ही वर्गणी फारच कमी आहे.

---

सर रिचर्ड टेंपल यांनीं काढलेलें ग्रेट ब्रिटनेंचे चित्र रमणीय असून त्यांतील राज्यकर्त्यांच्या वैभवदर्शनामुळें आह्मा राजनिष्ठ प्रजेस अत्यंत संग्रहणीय वाटतें पण तत्काळ दुःखाचा उमाळा मनांत उसळतो कीं या देशाचें चित्र कसें दिसेल बरें ! इंडिया सारखें प्राचीन राष्ट्र ग्रेट ब्रिटनच्या बरोबरीनें तुलण्यास अपात्र झालें व त्याच्या पूर्वकालीन वैभवाच्या व संपत्तीच्या गोष्टी इतिहासाचा विषय होऊन राहिल्या आहेत हा विचार सर्व मनोराज्यें विलयास नेतो. सांपत्तिक स्थिती देशाचें चित्र बरेंवाईट बनविते. संपत्तीचे मार्गच असे आहेत कीं तिच्या वाटा ज्या राष्ट्रांत हरहमेश लोक चालतात तेंच राष्ट्र अभ्युदयास चढतें व सर्व गोष्टी संपात्ति पुढें हात जोडून उभ्या राहतात. ग्रेट ब्रिटनची उन्नती व इंडियाची अवनती या समकालीन आहेत. सर रिचर्ड टेंपल यांनीं ज्या धनसंपादक कारणांचा विपूल प्रभाव ग्रेटब्रिटन संबंधानें वर्णिली आहे त्याच्या उलट एखाद्या इंडियन सर रिचर्डास त्याच कारणांच्या अभावामुळें या राष्ट्राचा दुःखमय न्हास वर्णावा लागेल. ब्रिटिश राष्ट्रांनें या देशाविषयीं उदार राजनीती अंमलांत आणिली पण या देशाच्या सांपत्तिक स्थितीचें उज्जीवन होणाऱ्या उपायांची प्रेरणा जशी उदारतेनें व दीर्घदृष्टीनें व्हावयास पाहिजे होती तशी होऊं दिली नाहीं. या देशाचा संपत्तिरूपी अश्व लंगडू लागला, तो औपयोपचाराच्या अभावामुळें अधिकाधीक लंगडा होत चालला व अखेरीस जमीनदोस्त होण्याच्या रंगांत आला पण त्याच्या उलट ग्रेटब्रिटनचा अश्व ग्रमेंतेत भरधाव चालू लागला, त्यास अनुकूल साधनांच्या बाहुल्यानें व वीरश्रीच्या प्रोत्साहक प्रेरणेनें वाऱ्या प्रमाणें गती मिळाली व सर्वत्र त्याच्या विजयाची धन्यता लोक गाऊ लागले. ग्रेटब्रिटन व इंडिया या दोन राष्ट्रांचा इतिहास जगास एक उत्तम गोष्ट शिकवितो ती ही कीं राष्ट्र वैभवशिखरास कसें पोचतें व न्हासास कसें पावतें. आह्मा इंडियनांस दोन राष्ट्रांच्या इतिहासांपासून वरील ज्ञान लाभेल तर आपल्या राष्ट्राची खरी सुधारणा करण्याचा अन्य मार्ग शोधण्याचें प्रयोजन नाहीं. ईश्वरकृपेनें राज्यकर्त्यांचा कित्ता आह्मापुढें आहे तोच आह्मी त्यांच्या शासनाखालीं चांगला वळवावा ह्मणजे ग्रेटब्रिटन व इंडिया या दोन राष्ट्रांचा एक जीव होईल व जगामध्यें एक अद्भुत व अजिंक्य राष्ट्र निर्माळें बनेल. ईश्वर करो आणि कल्पनासृष्टीतील हें राष्ट्र निदर्शनास येवो !

---

इंडियाचे वृद्ध पितामह दादाभाई नवरोजी यांनीं सर रिचर्ड टेंपला प्रमाणें इंडियाचें वर्णन केलें आहे त्यांत इंग्रजी राज्यामुळें इंडियांत दारिद्र्य आलें आहे असें प्रतिपादित केलें आहे आणि राज्यकारभाराच्या व व्यापाराच्या निमित्तानें या देशाची संपत्ति इंग्लंडांत जाऊं लागली ती इतकी कीं इंडियन लोकांचें रक्तशोषन होऊन ते निर्जीव बनण्याच्या पंथाला लागले आहेत. देशाची कल्पना त्या देशाच्या धनोत्पादक वस्तुस्थितीवरून केली पाहिजे आणि याच धोरणावर वरील वर्णन लिहिण्यांत आलें आहे.

नामदार भावनगरी यांचाही विचार मि. दादाभाई यांच्या प्रमाणेंच आहे. हिंदुस्थानच्या औद्योगिक स्थिती विषयी ते ह्मणाले कीं तीस कोट प्रजेपैकीं शेंकडा १० इसम देखील व्यापारी व कारखानदार नाहींत. उद्योगधंद्याला लागलेले असे लोक फार कमी आहेत. यांत्रिक कलेचा हत्ती ब्रिटिश लोकांस लाभल्यामुळें इंडियांतील हस्तकौशल्याचा व कारागिराचा उच्छेद झाला आहे. इंडियन लोकांची बुद्धि अगदीं निरर्थक व निरुपयोगी होत गेली आणि कल्पना, यांत्रिक शोध व कारागिरी हीं ब्रिटिश लोकांस अनुकूळ झाल्यामुळें उभय राष्ट्रामध्यें औद्योगिक स्थिती विषयीं मोठें अंतर पडलें आहे. ढाक्याची व बनारसेची मलमल नामशेष झाली, कालिकतचें कालिको कापड विलायतच्या गिरणीवाल्यास नमुन्या ऐवजीं झालें, देशी जाडीभरडा कपड्या पेक्षां विलायती स्वस्त व छानदार कपड्यानें सर्व देश व्यापून व मोहून टाकला. सरासरी ३॥ किंवा ४ लक्ष लोक इंडियाच्या गिरण्यांतून कामावर आहेत. बाकीची प्रजा उद्योगाच्या अभावामुळें धरणीला भारतूल्य बनली आहे. सुरतेचा रेशमी कारखाना बंद पडला आणि चिनाच्या रेशमानें सर्व बाजार भरून टाकला. राजकीय सुधारणा होण्या पूर्वी सांपत्तिक किंवा औद्योगिक सुधारणा झाली पाहिजे असें मि. भावनगरी ह्मणतात. आमच्या मतें सुधारणा उभय अंगानें होत गेली पाहिजे आणि आमच्या देशांतील विद्येचा उपयोग देशी गरजा भागविण्या कडे झाला पाहिजे.

---

The Berar Samachar
MONDAY APRIL
12 1897

## AGRICULTURAL EDUCATION
### No. 2

The third head is "*Training School.*" The agricultural conferences demand that teachers should be trained to teach all elementary sciences on the system of 'readers and object lessons.' Two obstacles confront this proposal. The first and one of the utmost importance, is that teachers in the lower classes of schools are so poorly paid that they cannot be compelled to go through a course in training school. In passing we would also observe that such is almost invariably the case in all lower classes. It is of the utmost importance that *intellegent* teachers alone should be entrusted with the intellectual development of young children. Unfortunately however, this point is not well appreciated and the pay of such teachers is always less than the pay of *chaprasis*, and as a natural consequence such teachers are often less intelligent and invariably less willing to work than the better paid chaprasi. So that the obstacle alluded to does not come in the way of agricultural teaching but the teaching of young children in general. The second obstacle is that it is difficult to provide competent instructors to such teachers as may attend the Training school.

The first obstacle touches the weak point—that of money. The second obstacle has been obviated by the Madras Government by requiring training school students to go through a course of agricultural instruction under a comptetent agricultural master on experimental farms in the vicinity of a Training school. In the Central Provinces practical action has been taken in sending passed students of Training schools for a six months' course under an educational officer at the agricultural farm in Nagpur. In the N. W. Provinces a few students after their "school trial" certificate go through a two years course at the government farm and are trained by the agricultural department. In Bombay it has been decided that all Training schools should be provided with an agricultural master who has obtained a college deploma.

Under the fourth head comes *Higher Agricultural Education.* The Government of India hold that high class Educational institutions professing to teach agricultural forestry, veterinary, science &c. should be national rather than provincial and thattwo national Colleges would at present meet wants of all India. The question has now been put up on a somewhat new footing and it is argued that practical education in agriculture and allied sciences ending in a College diploma or in an Agricultural degree develops the intelligence of students just as well as a literary course and that it equally fits them for duties in the land revenue and cognate services. This view was put into practical effect by a Government order (Madras) making the diploma in agriculture of the same value as a B. A. degree. The Madras Government says "we want as officials in the district men who had their thoughts directed to agriculture and whose minds have been taught to dwell upon it, whose reports in the state of the crops, the imminence of famine, or the condition of the agri—culture population will be animated by personal interest and intelligence of things agricultural, who when helping the cultivating classes with a state loan, distribution of seed and so forth or in stimulating them to adopt well tried improvements will have their zeal quickened by sympathy with and appreciation of the measures proposed." The out—come of the deliberations of these conferences has been that there should be four high class agricultural Colleges viz-at Madras, Bombay, Calcutta and some place in northern India It has been urged that in every province which possesses or makes use of an agricultural College there must be a special school course leading up to it. To conclude, the government of India are content to place on record the discussions held in the Conferences that.

(1) In Government service Agricul—tural degrees will have the same weight with literary or science degree.

(2) That there should be four high class institutions for Agriculture at the places mentioned above.

(3) In certain appointments agricultural diploma should be necessary.

(4) Practical instruction of candidates for some subordinate appointments be further considered.

(5) Thas a special agricultural school course be required.

(6) School masters either before or after their appointments be encouraged to pass through a course on a Government farm.

---

In explaining how to utilize the land records the Government of India make it a special point to notice the three features of agricultural failure. We quote below an exact description of the three phases:—

"It was represented to them that agricultural failure, *i e*, 'failure to reach the highest attainable standard' might be '(1) of occasional, (2) of gradual, or (3) of presistent character'; that it was to be the object of the whole scheme of enquiry to minimize agricultural distress and agricultural loss in each class of cases; and that the first step was to decide how far the land records machinery could be utilized in the investigations under each head.

(1) *Occasional failure* was explained as "sudden distress due to unforseem calamity, such as failure of rain, hail storms, inundations, etc., requiring as a rule, immediate relief." In these cases the land records are of primary service to district officials as indicating the extent and character of the calamity The functions of the director of the land records department are confined to organising or to suggesting how to improve the system under which prompt and continuous information supplied by the records should be brought before the responsible authorities and to ascertaining that proper effect is given to the system.

(2) *General failure* was explained as 'gradual deterioration due to ascertainable causes requiring early and special measures of prevention and relief.' Considerable distress has been known to have occurred in many parts of India in consequence of neglect to relieve the population of agricultural tracts which had suffered from cattle murrains, from swamping due to the interference of drainage by railway embankments or canals, from the growth of a noxious weed, and from other causes which gradually reduce the value of land or affect the prosperity of the people. 'In almost every province,' it was written, 'the detailed records now maintained under careful inspection by village officers provide, although in scattered forms and in troublesome detail, all the information necessary for indicating the serious deterioration of any agricultural tract, and it only remains to make provision for such a clear and simple abstract of the information and statistics

embodied in the village registers as will enable district officers to grasp the pertinent facts without real difficulty or unnecessary waste of time.'

(3) *Persistent failure* was defined as failure to reach the highest attainable standard, due to causes or defects of a more or less persistent character and requiring prolonged investigation. Such causes or defects are, it was explained, want of irrigation, frequent liability to failure of rain, insufficiency in the wood or fuel supply, cattle diseases, plant diseases and blights, want of drainage, the prevalence of saline efflorescence, proved imperfections in agricultural practices, the want of suitable manures, and so on."

## वऱ्हाड

हवामान—यंदाचें ऋतुमान अगदीं अनुमानाच्या पलिकडचें आहे. गर्भावळीचे ढग येऊन उकडत होते. मध्यंतरीं पावसाचा रंग दिसला. कालपासून हवा स्वच्छ, निरोगी, व उष्ण आहे पण रात्रीच्या थंड हवेनें पुष्कळ बरें वाटतें. पाण्याचा बोभाटा विशेष आहे व दुष्काळाचें पाऊल फार पुढें आहे. काल तिसरे प्रहरीं पावसाच्या दोन चागल्या सरी पडल्या.

येथील डायरेक्टर आफ लांड रिकार्डाचे आफिसाच्या तिजोरींतल्या ७००।८०० रुपयावर कोणी लाट मारला होता पण पोलिसाच्या कारवाईनें गुन्हा पत्त्यांत आला व कांहीं शिपायांचें दुष्कर्म उजेडांत आलें.

गेल्या सोमवारीं व मंगळवारीं दोन खटल्या निमित्त आकोल्यास सेशन कोर्ट भरलें होतें. पहिल्या खटल्यातील आरोपी औरंगादेचा रामदीन यानें मखु नांवाच्यां एका मुरलीचा सुरीनें खून केला होता ह्मणून त्यास देहान्ताची शिक्षा सांगितली. आणि दुसऱ्या खटल्यांत जनुना येथील रावजी पाटील हा आरोपी होता. खोटी पावती केल्याबद्दल १ वर्ष सक्त मजुरी व २०० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा सप्टेंबरच्या ६ वे तारखेस होणार आहे. उमेदवारांनीं आपले अर्ज जूलैच्या १ ले तारखेच्या आंत पाठवावे.

जिल्हा बोर्डाच्या आकौंटंटच्या जागीं असणारा इसम ९ वी इयत्ता पास झालेला असावा व त्यानें दोन वर्षाच्या मुदतींत आकौंटंटची परीक्षा द्यावी असा नियम करण्या विषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांचा विचार आहे.

डाक्टर शार्मल हे येथील सिव्हील सर्जना चे जागीं येऊन दाखल झाले व त्यांनीं येथील तुरुंगाचा चार्ज घेतला.

रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. हे हल्लीं हुशंगाबादेस मुनसफ असून तहशीलदारीचे अधिकारही सध्यां त्यांच्याच कडे दिले आहेत. राजश्री गंगाधरपंत यांची इच्छा मध्यप्रांतांत जाण्याची फार होती आणि बहुत करून तिकडेच यांची नेमणूक पक्की होईल असें आह्मास कळतें.

अलिशान रेसिडेंट मि. चिचिली फ्लैडन साहेब यांची स्वारी तीन महिन्यांच्या रजेवर गेल्या मंगळवारीं हैदराबादेहून निलगिरीच्या थंड हवे कडे गेली आहे.

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना.

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सर्टिफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा आक्ट १० कलम १० प्रमाणें:—

क्लास १३ आर्जाचा नंबर १ सन १८९७

विद्यमान सि० जज्ज साहेब बहादूर जिल्हा अकोला. यांचे कोर्टांत.

अर्जदार बाळगीर व गोविंदगीर गुरु गंगागीर दोघे अज्ञान पालन करणार संतोषगीर गुरु गणेशगीर जात गोसावि.

राहणार मोरगांव

वरील अज्ञान बाळगीर व गोविंदगीर गुरु गंगागीर राहणार मोरगांव ता० अकोला जि० अकोला. यांणें [ याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचे सर्टिफिकीट मिळावें ह्मणून ] त्याचे पालन व मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तैवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ करता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २४ माहे एप्रील सन १८९७ इ० रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हकीकती दाखल कराव्या.

ता० ९ माहे एप्रील सन १८९७ इ०

सिव्हिल जज्ज.

Sheikh Ismail

दि० क्लास १३ मिसल नंबर १/१८९७

विद्यमान सिव्हिल जडज्ज साहेब बहादूर कोर्ट अकोला,

बाळगीर व गोविंदगीर गुरु गंगागीर राहणार आसेगांव तालुके अकोट दोघे अज्ञान तर्फे पालन करणार संतोषगरि गुरु गणेशगीर राहणार मोरगांव तालुके अकोलें. — वादी

अर्ज अज्ञानाचें व त्यांचे इष्टेटीचे पालन करण्याचें सर्टीफिकिट मिळण्याबद्दल

मी अर्जदार अर्ज करितों कीः—

१ गंगागीर गुरु दयाळगीर गोसावी हा तारीख सन १८९४ चे भाद्रपद मासीं आसेगांव येथें मयत जाहला त्याचे मागें त्याची इस्टेट स्थावर जंगम आहे. त्याचे मागें त्याचे चेले बाळगीर व गोविंदगीर हे त्याचे इस्टेटीचे वारस आहेत. ते अज्ञान आहेत. अज्ञानाचे आईचा भाऊ संतोषगीर अर्जदार हा आहे. त्याचे इस्टेटीची व्यवस्था त्याची आई गुजाबाईच्या हातून नीट होत नाहीं. ती नीट राहून अज्ञानाची इस्टेट कायम राहावी या हेतूनें अर्जदार अर्ज करीत आहे. अज्ञानाची जंगम जिनगी होती ती त्याची आई गुजाबाई इनें बहुतेक भांडण कज्यामध्यें खर्चून टाकली आहे आतां बाकी आहे तीं फार थोडी व नेहमीचे निर्वाहास लागणारी आहे अज्ञानाची स्थावर जिदगी आहे ती येणें प्रमाणें:—

| ज्या गांवची शेती त्या गांवचे नांव व तालुका | शेत सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये | शेरा. |
|---|---|---|---|---|
| बडनेर गंगाईचें ता० दर्यापूर | १७४ | ७-२२ | १९ | यांतील निमे हिस्सा |
| मौजे आसेगांव तालुके अकोट | १२ | ४-९ | ८ | सालीम |
| | ३२ पैकीं | ४-३४ | १० | सालीम |
| | १३९ | १-३६ | २-८ | सालीम यांत मळा आहे विहीर आहे व मयताची समाधी आहे राहावया करितां मढी आहे वरील शेतातील झाडे वगैरे सर्व. |
| मौजे एरंडगांव परगणे वडनेर तो. दर्यापूर | २ | १९-१९ | ३३ | सालीम |
| मौजे काळ गव्हाण तालुके दर्यापूर | २१ | १९-२ | २८-६ | यांतील निमे हिस्सा |
| मौजे कडतवाडी तालुके अकोट | १७ | ४-३१ | ९ | सालीम |
| | २० पैकीं | २-२६ | ४-८ | |
| मौजे काळवाडी तालुके आकोट | ९९ | ९ | १० | सालीम |
| | ८७ | -३१ | २ | |

वर प्रमाणें शेती असोन मयताचे मौजे आसेगांव तालुके अकोट येथील राहण्याचें घर धाब्याचे वरती माडी आवारासुद्धां अंदाजे लांब १० हात रुंद हात १० चे आहे. याशिवाय मयताची स्थावर इस्टेट असल्याबद्दल अर्जदार यास माहीत नाहीं.

गार्डिन आक्ट कलम १० (१) प्रमाणें माहिती पाहिजे ती येणें प्रमाणें:—

बाळगीर व गोविंदगीर गोसावी उमर अंदाजे १४ व १० हे आसेगांव तालुके अकोट येथें राहतात.

अज्ञानाची इस्टेट अर्जाचे कलम १ यांत दिलेली आहे तिची किंमत अंदाजे रुपये १५०० आहे. (शेतांची किमत अंदाजे ९०० व मळ्याची ४०० व घराची किंमत रुपये २०० आहे.)

वरील इस्टेट कांहीं अज्ञानाचें आईचे ताब्यांत आहे. व कांहीं तिनें अधिकार नसतां अफरातफर केलेली दिसते.

अज्ञानास त्याचे आई व अर्जदाराचे शिवाय दुसरा कोणी जवळचा नातलग नाहीं त्याची आई गुजाबाई जवजे गंगागीर ही आसेगांव येथें राहते. हा अर्ज. अज्ञानाचे इस्टेटीचे रक्षणाकरितां मयतानें नेमणुक केलेली नाहीं.

पालन करण्या करितां पुर्वी अर्ज केलेला नाहीं. अशी अर्जदाराची माहिती आहे. हा अर्ज अज्ञानाचे इस्टेटीचे रक्षणा करितां केलेला आहे. अज्ञानाचें पालन त्याची आई करीत आहे त्यास हरकत माझी नाहीं. अर्जदार पालन करण्यास कबूल आहे. अर्जदार हा अज्ञानाचा मामा आहे व त्याचे इस्टेटीचें संरक्षण करण्यास समर्थ आहे अज्ञानाचे पालणपोषण व त्याचे इस्टेटीचें संरक्षण त्याची आई आजवर करीत होती तिनें अज्ञानाचे इस्टेटीची असमजुतीमुळें अफरातफर केलेली आहे. या संबंधांत एका शेता संबंधे वि. सि. ज्य. अकोला यांचे फैलावरील मु॥ नंबर १०७ चा जाहला आहे.

——

९६

व आईनें दिलेलें खरेदीखत रद्द ठरलें आहे. शेत अज्ञानाचें ताब्यांत देण्याचा हुकूम जाहला आहे तें ताब्यांत देण्या बद्दल तजवीज पालन करणार कायदेशीर नेमिल्या शिवाय व्हावयाची नाहीं. करितां अर्ज केला आहे.

अर्जदाराची विनंती कीं वर निर्दिष्ट केलेले इस्टेटीचे संबंधांत अज्ञानाचे पालन करणाराचे सर्टिफिकीट अर्जदार यांस द्यावें. ता० ३१।३।९७ इसवी.

सही

संतोषगीर गुरु गोविंदगीर

मी संतोषगीर गुरु गोविंदगीर अशी प्रतीज्ञा करितो कीं सदर्हू अर्जांत लिहिलेला मजकूर माझे माहिती प्रमाणें व समजुती प्रमाणें खरा आहे. तारीख

संतोषगीर गुरु गोविंदगीर द. खु.

खरी नक्कल

Tukaram Waman

शिरस्तेदार

नोटीस

नोटीस बेशमी— गणपती वा गंभीरजी पाटील राहाणार मौजे खंडाळें ता० बाळापूर यांसी खालीं सही करणार नामदेव बल्लद विक्रमजी पाटील राहणार मनारखेडे बुा तालुके बाळापूर नोटीस देतो ऐसाजे माझी पांच शेतें तुमचे जवळ रुपये २००० दोन हजार ऐवजी गाहाण ठेऊन गाहाणखत रजिष्टर करून दिलें त्यांत मजला मरणा. पूर्ण पावला नाहीं असे असूनही तुमची आमची आपसांत मौजे मनारखेडे बुा येथें मढीवर समजूत होऊन वसूल वजा जाता एकंदर १५०० पंधराशे रुपयावर तंटा तुटला त्या समयी प्रमुखपंच होते. ते येणें प्रमाणें मिठुलाल मोहोनचंद गुजर. हरी वा भिवसन इंगोडे, इश्राम वा श्रावण पाटील, पुंजाजी वा वाहादण उगले, सोनाजी वा कवडाजी ठाकरे, या शिवाय आणखी गावांतील लोक तेथे होते सदर्हू पंचा समक्ष जो निकाल झाला त्या प्रमाणें तुह्मास रुपये १५०० देण्याकरितां मी आपले शेत इश्राम वा श्रावण पाटील राहणार सातरगांव तालुके बाळापूर याजला २५०० दोन हजार पाचसे रुपयास विकून तुमचे कबुली प्रमाणें रुपये देण्यास तयार असतां तुह्मी घेत नाहीं सबब या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांचे आंत आपले रुपये १५०० घेऊन जाऊन याजबद्दल पावती लिहून द्यावी व जमिनी वरील गहाणाचा हक्क सोडला अशा विषयींचा लेख करून देऊन रजिस्टर करून द्यावें. असें न केल्यास कोर्टाचे खर्चाचा व तुमचे रकमेचे व्याजाचे जबाबदार होणार नाहीं. ही नोटीस दिली सही तारीख १०-४-९७ इ.

( सही )

नामदेव बल्लद विक्रमजी पाटील.

वर्तमानसार

इसयाशी आपला चांगला परिचय झाल्या नूनच हा प्रभाव आपल्या निदर्शनास येऊं गला आहे. या पूर्वी असा व्यापक अर्थ सशयपर्णे या शद्बांत नव्हतां इतकेंच हे तर ह्यांची ( शद्बांची ) नुसती पुसट पनाहि आपल्या लोकांच्या डोक्यांत लेली नव्हती. गतकालच्या लोकांनीं मराठे लोकांनीं ) ह्या हिंदुस्थान देशांत अगदीं अलिकडे अलिकडे धामधूम उ- न दिली त्यास ज्या मनोवृत्ती कारण झा- त्या केवळ वरच्या सारख्याच नव्हत्या. दास स्वामी, केशव स्वामी आदिकरून त्र संत मंडळींनीं ज्या भव्य इमारती क- ां जागा मुकरर करून साफसूफ करून ली. छत्रपतीच्या अध्यक्षतेखालीं प्रताप- गुर्जर, बाजी देशपांडे, तानाजी मालुसरे दि करून मर्द इसमांनीं आपल्या रक्त- साचा चिखल करून ज्या इमारतीचा या भरून काढला; बाळाजी आवजी ळे, आदिकरून कुशल कारागिरांनीं ज्या रतीचे सोपे तयार करून ठेविले; आणि र पेशव्यांच्या प्रभुत्वा खालीं पटवर्धन, दे, होळकर वगैरे बहादुरांनीं पूर्वीच्या प्यावर मजलेच्या मजले उठवून देऊन ती कलशारोहण केलें, त्या मराठी सा- ज्यरूपीं भव्य इमारतींची धुळधाण होऊन ड शतकाचे आंतच तिजवर नांगर फिर- ला गेला. हा असा शोचनीय प्रकार व्हा- का? याचीं कारणें कोणतीं? हा संपूर्ण ष कोणत्या वर्गाचे माथीं? या प्रश्नांचा चार करण्या कडे इंग्रजीच्या अव्वल अम नींत होऊन गेलेल्या आंग्लभाषाभूषित डितांचें लक्ष वेधलें गेलें आणि अशा वेग ळ्या प्रति–वाग्भट्टानीं संपूर्ण देशाच्या वनतीचें जें निदान ठरविलें तें मुख्य मुख्य बतींत एकमेकाशीं अगदीं तंतोतंत मिळालें. ी आपण एक दिलानें झटून ज्या सामा- क सुधारणेच्या मागें लागलों आहों हीच माजिक सुधारणा घडून आणण्याकरितां वेळच्या समाजांत प्रचलित असलेले ाग्रह, अज्ञान, व घातक चाली, इत्यादि सून आलेले दोष ह्या पूर्व कालीन पंडितां- मोठ्या धैर्यानें आणि निर्भिडपणानें वेळच्या लोकास दाखवून दिले. ह्या गील विद्वानांनीं आपल्या सामाजिक स्थि- त जे दोष काढिले आणि सुधारणा कर- ाची जी सामान्य दिशा दाखविली तेच प अर्थात कमी जास्त प्रमाणानें आपल्या ाजांत आपण हल्लीं काढीत आहोत आणि चा प्रतिकार करण्याची खटपट करीत होत. बहुजनसमाजांत हल्लीं सामाजिक बतींत जे विचार रूढ झाले आहेत व त्यास निश्चित स्वरूप आलें आहें त्यांचें श्रय स्तविक पहातां मागील विद्वानास दिलें पाहिजे से असतां अशा पंडितांची संभावना आ- ल्यांतील प्रसिद्ध निबंधकार अथवा प्रति ाले मालाकार यांनीं कोणत्या रीतीनें ी आहे हें पहाण्यास मालेचे १०१९ क पुरे होतील. ज्या लोकांवर टिका ावयाची त्यास तत्कालीन कालाचा यदा दिला पाहिजे अशा आशयाच्या पल्या मालेतील फुलांत ज्यानें अनेक पा- ल्या भरून दिल्या आहेत व येथून तेथून वींवर यथेच्छ तोंडसुख घेऊन त्यास मूर्ख रविण्याचा प्रयत्न केला आहे त्याच मा- ाकारांनीं मागील विद्वानावर टिका करि- ताना वरील उदार तत्वाकडे जाणून बुजून दुर्लक्ष्य केलें. एखाद्यानें डोंगराचे माथ्यावर उभे राहून मी त्यापेक्षां किती उंच आहे अथवा मोठ्या धिप्पाड पुरुषाच्या खांद्यावर बसून आपल्या उंची बद्दल फुशारकी मा- रावी पण आपणास आधारभूत असलेल्या गोष्टीकडे लक्ष देऊं नये अशातलाच हा प्रकार. असो ह्यासंबंधानें अधिक विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे.

आपणांत सुशिक्षित ह्मणविणारे लोकांत दोन मुख्य तट आहेत. एकाचें ह्मणणें, आ- ह्मास सध्याचे स्थितींत सामाजिक बाबतींत खटपट करण्याची कांहीं जरूर नाहीं. सा- माजिक सुधारणा ही आपोआप घडून येणारी गोष्ट आहे. सध्याचा काळच अशा प्रकारचा आहे कीं तो सामाजिक बाबतींत कोणासही एके स्थानीं निश्चळ राहूं देणार नाहीं. आ- पल्या ओघा बरोबरच त्याला अनायासें पुढें ओढून नेईल या करितां वेगळा प्रयत्न न करितां आपला सर्व जोर आणि जोम रा- जकीय हक्क संपादन करण्याकडे खर्चीं घातला पाहिजे. राजकीय सुधारणे बरोबरच आमची सामाजिक सुधारणाही पण होईल.

त्यांचा दुसरा मोठा आक्षेप असा आहे कीं राष्ट्रीय सभेची नक्कल करून अगदीं हुबेहूब तशाच अर्थाचें नांव देऊन सामाजिक सुधा- रणा करणारांनीं आपल्या परिषदेस राष्ट्रीय बनविलें आहे. हिमालया पासोन तों क- न्या कुमारी पर्यंत जेव्हढे म्हणून प्रांत आ- हेत तेवढ्यांच साम्राज्यत्व एका प्रभूकडे असल्या कारणानें सर्व लोक एक सत्तेच्या छत्राखालीं नांदत आहेत. एकाच नावेंत ब- सून पर्यटन करण्यास निघालेल्या मंडळीचा परस्पराशीं हिताहिताचा संबंध असतो त- द्वत इंग्रजी अमलांतील सर्व प्रजेचें राजकीय बाबतींत हिताहित एक होऊन गेलें आहे ह्मणून राजकीय बाबतींत आपणांस राष्ट्रीय स्वरूप येणें निर्विवादपणें शक्य झालें आहे. आपल्यांतील सामाजिक गोष्टी व धार्मिक गोष्टी ह्यांचा परस्परांशीं एक जीव झाला आहे. आपल्यांत अशी ए- खादी सामाजिक गोष्ट नाहीं कीं जी धर्माचे नांवाखालीं मोडली जाणार नाहीं. असा प्रकार असल्यानें सामाजिक बाबती संबंधानें विचार करणें ह्मणजे परोक्ष रीतीनें धर्मा- चाच विचार करणें होय. धर्माचे बाबतींत आपल्या देशांत किती वैचित्र्य आहे हें सां- गणें नको. एकीकडे शंकराचार्यांच्या प्रभुत्वा खालीं नांदणारे लोक आहेत तों दुसरीकडे शंकराचार्यांचें नांवही माहीत नाहीं असे व दुसऱ्या एखाद्या आचार्याच्या सत्तेखालीं नांदणारे लोक आहेत. एकीकडे पैगंबराला अनुसरणारे लोक आहेत, तों दुसरीकडे अ- हिंसा परमोधर्मः या मताचे अनुयायी आ- हेत. एकीकडे नानक गुरू गोविंद यांची दिक्षा धारण करणारे आहेत; तों दुसरीकडे रामरहिम सब एकंकार मानणाऱ्या संताच्या मताचे आहेत. या शिवाय समाजिष्ट वगैरे नुतनोद्भव भेद अनेक आहेत ते वेगळेच. हा एक प्रकार झाला. आतां सामाजिक चाली रीती संबंधानें पाहूं जातां असा प्रकार नजरेस येतो कीं एका प्रांतांत पतीबाहुल्य पद्धत सुरू आहे तों दुसऱ्या प्रांतांत तिचें नांवही नसून ह्या पद्धतीच्या उलट पत्नीबाहुल्य पद्धत जारीनें अमलांत आहे. कांहीं जातींत बाल विवाहाचें नांवही नाहीं तों दुसऱ्या जातींत मुलें उपजण्या पूर्वींच त्यांच्या विवाहा बद्दल ठराव केले जातात. एका जातींत पुनर्विवाह मना आहे तों दुसऱ्या जातींत पुनर्विवाहाच्या आवृत्तीवर आवृत्ती निघतात. अशा प्रकारच्या सामाजिक बाबतींत आप- ल्यांत पूर्व पश्चिम दिशा इतका विरोध दिसून येतो. सामाजिक बाबतीचा विचार करणें ह्मणजे परोक्ष रीतीनें धर्माचाच विचार करणें होय. आणि धर्माच्या बाबतींत ढवळाढवळ करणें ह्मणजे आपल्या लोकांत आपसाआप- सांत यादवी माजविणें होय कारण धर्मा इतकी नाजूक बाब दुसरी कोणतीच नसून लोकां- च्या मनोवृत्ती, या विषयाची चर्चा केल्यानें संक्षोभित होतील. युरोपांतून रशिया काढला असतां सर्व यूरोप खंडाचा जो आकार भरेल तेव्हढा मोठा आकार नुसत्या आमच्या एक- ट्या हिंदुस्थान देशाचा आहे अशा अफाट देशांत अनेक वर्णाचे, अनेक धर्माचे, अनेक भाषेचे, आणि अनेक मताचे लोक असल्या- मुळें सामाजिक बाबतीत वरील कारणांनीं त्यांचे एक राष्ट्रीयत्व कधींच संभवणार नाहीं आणि ह्मणून राष्ट्रीय सामाजिक परिषदेसा- रिखा प्रयत्न करणें मूर्खपणाचें होणार आहे.

( पुढें चालेल )

## वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ९ शके १८१९

युरोपांत लढाई सुरू झाली हें मोठें दु- श्चिन्ह होय! सध्यां टर्की व ग्रीस हीं दोन राष्ट्रें भांडत आहेत. पण या कलहाचा परि- णाम कोठवर लांबेल हें कांहीं सांगवत ना- हीं. युरोपांतील इतर राष्ट्रांचे कल पूर्वी पासूनच दोन पक्षा पैकीं एका पक्षाकडे ठरलेले आहेत. सध्यां तिऱ्हाईतपणा इतर राष्ट्रांनीं दाखविण्याचा आव घातला आहे. पण हा तटस्थपणा फार काळ टिकेल असें वाटत नाहीं. क्रीट बद्दल थोड्या महिन्या पूर्वीं टर्की व ग्रीस यांच्या मध्यें लढाई जुंपली आणि क्रीटचें स्वातंत्र्य कायम ठेवण्या विषयीं इतर राष्ट्रवाल्यांचाही निश्चय आहे. रशिया सरव्हिया, बलगेरिआ व मांटेनिग्रो यांनीं स्वस्थ बसण्याचा संकल्प बाह्यतः प्रदर्शित केला आहे पण सध्यांच्या लढाईत हीं राष्ट्रें चळवळ करितील हें पक्कें आहे. एपिरस ज- वळ सर्व लढाई चालू आहे. टर्कीचा प्रेव्हीसी किल्ला व ग्रीसचा आनटिअम किल्ला हे उभ- यतां समोरासमोर परस्परांच्या सामायिक हद्दीवर आहेत. दारू गोळा धडाक्यानें चा- लला आहे, मनुष्यें पटापट मरत आहेत आ- णि हें रणकंदन सर्व युरोपभर माजेल अशी भिती आहे. १९ व्या शतकाचीं हीं अखेर- चीं वर्षे मोठीं अनिष्ट कारक व राज्यक्रांती- चीं दिसतात.

परस्परामधील दळणवळण वाढवावें, बो- र्डाची कामगिरी उत्कृष्ट रितीनें बजावली जावी आणि बोर्डाच्या कार्या निमित्त एकत्र जमणाऱ्या सभासदांची व्यवस्था व सरबराई नीट राहावी ह्मणून अकोट तालुका बोर्डानें एक नामी युक्ती योजिली आहे. रा. रा. अनंत विष्णु भागवत यांनीं पुढाकार घेऊन एक तालुका बोर्डाचा क्लब स्थापित केला आहे. या क्लबाचा उद्देश असा कीं बोर्डाच्या कामासाठीं जेव्हां सभासद मंडळी अकोटास किंवा तशहाऱ्यास जमतील तेव्हां त्यांनीं या क्लबाच्या ठिकाणीं उतरावें व त्यांच्या जेव- णाखाण्याचा वगैरे बातवेत तेथेंच ठेवण्यात येईल. ही पाहिली सोय झाल्यामुळें सभासदांच्या अनेक अडचणी दूर झाल्या. त्यांस बोर्डाचें काम विशेष फुरसतीनें व एक दिलानें करण्यास सांपडेल. सर्व मंडळी ए- काच ठिकाणीं उतरल्यामुळें परस्परांचा प- रिचय विशेष वाढेल आणि आपापल्या गां- वच्या गोष्टी परस्परांस कळविण्यास एक उ- त्तम मार्ग खुला होईल. एकत्र जेवणखाण, बसणें उठणें व बोलणें चालणें इतक्या गोष्टी घडल्या ह्मणजे पुष्कळ अकल्पित फायदे होतात. एकमेकाचा घसट पडली व दील जुळलें ह्मणजे कोणतेंही कार्य फार छानदार होतें. नवीन क्लब होण्याच्या पूर्वीं सभा- सद मंडळी सभेला येत आणि घटकाभरा- च्या अवधींत कांहीं ठराव मंजूर नामंजूर करून घरोघर जात असत. त्या पेक्षां आतां सलोख्याचा प्रकार व घरगुती वादविवादाची पद्धती हीं विशेष सुखावह व फलदायक हो- तील. सध्यां या बोर्डाच्या क्लबच्या खर्चा साठीं आपसांत वर्गणी करून फंड उभारला आहे आणि त्यांतून सर्व खर्च भागविण्यात येईल. ही क्लबाची कल्पना मोठी नामी आहे आणि इतर तालुक्यांच्या बोर्डांनीं ही अवश्य स्वीकारावी. आमच्या मतें अशा क्लबांचे सर्व वाजवी खर्च बोर्डाच्या फंडांतून करण्या वि- षयीं सरकारानें मंजुरात दिली पाहिजे लोक आपला वेळ, अनुभव व वजनदारी यांचा फायदा सरकारास मोफत देतात तर हा ख- र्च सरकारानें उदार दिलानें सोसणें बरें दिसतें.

सरकारी दुष्काळाचीं कामें लोकांस फार शीं सुखावह होत नाहींत इतकेंच नाहीं तर लोकांस मोठी तखलीफ होते. दुष्काळाच्या कामावर रोजी अगदीं थोडी मिळते तिच्याव- र केलें तरी प्राणरक्षणा पुरतें पोट भागतें. मजूरदार अगोदर शक्तिहीन होत चालले आ- हेत आणि त्यांत या प्रांतांतील उष्णतेच्या मानानें मनुष्य आधींच हलक व कमजोर होतो. आपण नेहमीं पाहतों कीं या उन्हा- ळ्याच्या दिवसांत काम थोडेंच करवतें. असें असून देखील दुष्काळ कामावर प्रत्येक मजू- राच्या प्रत्येक दिवसाच्या कामाचें माप तंतो- तंत घेतलें जातें. हें मापलेलें काम ठरीव का- मापेक्षां कमी उतरलें तर लागलीच कमतर तेच्या मानानें मजुरीच्या पैशाला कांट मार तात. या कटाईमुळें लोकांचा मोठा छळ हो- तो. शिवाय दुसरी अडचण बायका संबंधानें आहे. सरकारी हुकूम असा आहे कीं दोन पु- रुषामागें एक बायको या किंवा अशाच प्र- माणानें माणसें कामावर घ्यावींत या हुकूमा मुळें पुष्कळ बायकांस सरकारी कामावर

मजूरी मिळत नाहीं इतकेंच नाहीं तर कित्येक कामावर पूर्वींच रुजूं असलेल्या बायकांस एकदम रजा देण्यांत आली. ही व्यवस्था अती वाईट आहे आणि अशा दुष्काळाच्या वेळा सरकारांतून कडक हुकूम निघूं नयेत असें कित्येक व्यवहारज्ञ आफिसरांचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ, रा. रा. देवराव जयकृष्ण हे तेल्हाऱ्या कडील कामावर मुख्य आहेत. त्यांच्या दारावर मजूरी साठीं प्रार्थना करणाऱ्या बयांची गर्दी होते तेव्हां त्यांस अतिशय दुःख वाटतें पण सरकारी हुकूमामुळें त्यांचा अगदीं नाइलाज झाला आहे. लोकांची दैना वाढत आहे अशा वेळीं सरकारानें दिलदारी विशेष दाखवावी अशी आमची विनंती आहे.

---

आकोला जिल्हा बोर्डाच्या ताब्यांत गेल्या १ ले तारखे पासून खामगांव-शेगांव रस्ता व खामगांव-नांदुरा रस्ता असे दोन रस्ते घेण्यांविषयी अलिशान रेसिडेंट साहेबांनीं हुकूम फर्मावला आहे. हे रस्ते या पूर्वी पाब्लिक वर्कस खात्याकडे होते आणि त्या निमित्त सालिना ५००० रुपये खर्च येतो. हे रस्ते या पुढे प्रांतिक रस्ते ह्मणून ठेवण्याचें प्रयोजन दिसत नाहीं असा वरिष्ठांचा अभिप्राय आहे. गेल्या चार पांच वर्षांचा हिशोब पाहतां आकोला जिल्हा बोर्डाला १७।१८ हजार रुपये सालिना उत्पन्न रोडसेसचें होतें पण बोर्डाच्या रस्त्या निमित्त उत्पन्ना पेक्षां खर्च अधिक येतो अशी खरी स्थिती असून हा सालिना पांच हजार रुपये खर्चाचा बोजा बोर्डावर लादण्यांत आला ही गोष्ट वाईट होय. नुकतीच शाळा खात्या निमित्त बोर्डास मिळत असलेली रक्कम बंद करण्यांत आली आणि हा नवीन बोजा लादण्यांत आला हा प्रकार बोर्डाचीं कामें सुयंत्र चालविण्या पैकीं दिसत नाहीं. जिल्हे-बोर्ड बंद करण्यास या सारखे प्रकार फार उपयोगी होतील हें जसें सरकारास पूर्णपणें माहित आहे तसें आतां लोकांच्याही निदर्शनास येत चाललें आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL 26 1897

In India, the Local Self Government will work very well if it be given a fair trial. Lord Ripon founded it as a experimental measure. The experiment is a success though it is limited to a small sphere of administrative work. The policy of introducing it was based on liberal principles of educating the Natives of India in politics and of giving them a large share in the administration of their local wants. The result we have arrived at bids fairly in regard to its future prospects. The system should be developed on a larger basis. The field of its working should be amplified. People should be consulted in a liberal manner as to their aspirations. The scheme of Lord Ripon served the Indian nation as a training school where we learnt the alphabets of local Self Government. We have learnt the principles of representation and have understood the modern tendencies of governing by the concerted voice of the majority. We now value most the right of voting and the honor which attends the dignity of serving ourselves and our own neighbours. The success of over ten years promises a golden prospect and we hope to realize it in course of time.

But our experiences of the past are not without some sad lessons for the future. Lord Ripon sowed the seed of Local Self Government. A new plant sprang up but it was not well watered by his successors in the office of Viceroy of India. The Government of India could easily see that the people have acquired the art of administration. Instead of facilitating the working of the new institution the Government clogged its path with additional difficulties. In the Local Self Government, they found a very serviceable machinery to shuffle off their own responsibilities without making an adequate provision of funds. It was a bad stroke of policy to curtail the funds of an institution like this and to saddle it however with larger and heavier liabilities. The District Boards and Municipalities are no doubt excellent public bodies where men of genius, culture, liesure and competency of income try, to the best of their abilities, to serve the masses at large. We need not mention that all this work is honorary and disinterested. If Government get unpaid gentlemen to serve in their work of administration the Government pursue an unsound policy in crippling the funds of such local bodies whilst they increase their liabilities from time to time. It is a suicidal economy to put such a policy to experiment. If Local Self Government is a failure to a large or small extent the result is due to this course of conduct on the part of the Government.

---

We are afraid of the future destiny of the District Boards. We suspect a secret blow to its future success in so far as the Government are misled to think that the work under their old direct agency and supervision was of superior value. It is an ill wind that blows good to no body. If these local bodies are to be condemned on the above line of argument it shows a bad and ungrateful taste in the authorities. The work of so many years and of so many *honorary* servants of the public cause goes for nothing. The Government have the prerogative to give a decisive opinion and the latter is a standard authority until it is cancelled or condemned. The District Boards and Municipalities have brought forth *native* genius to work *gratis* and the strict control and admirable management of these bodies raise hopes for an enlargement of their working on a larger and more liberal principle. We do not say that there are no defects. Every human institution has its shortcomings and due time and action are the only agents to remedy them. If we perceive more weak points in this new machinery than in the old one the great result is due to minute scrutiny, easy discovery of defects, and a rapid means to set matters right. In fact, a magnifying glass is provided in the new system; and it should be used to understand the inner working and the several correlations of the different portions of the machinery. It should never be an instrument to frighten us away with the large magnitudes of the latent and rotten defects in the new bodies. Besides in Berar these bodies are mostly under the direct control of District officers and their subordinates. In Berar people have not yet taken on their shoulders the large responsibilities of a public life. A public life is not valued at its high intrinsic price and hence people are more or less timid to cross the minds of the Government officers in the best interests of society. The spirit of opposition and emulation does not yet enliven our public discussions. If in this lame condition we are further checked in our march towards the thorough adoption of Local Self Government we think we have a bad time in store for us. Let us however hope that this is not so.

---

## वऱ्हाड

हवामान— मध्यंतरीं बुधवारीं सायंकाळीं तुफानाचा वारा सुटला होता. ऊन अती तापतें, उकाडा मनस्वी होतो आणि वारा अगदीं बंद असतो. लोक पाण्याच्या कमताईमुळें हैराण झाले आहेत आणि दुष्काळाचा तडाखाही लोकांच्या तोंडचें पाणी पळवीत आहे.

रा० रा० रामुलाल आगरवाला पंचगव्हाण यांजवर अफूचा साठा गैरकायदा ठेविल्याबद्दल जिल्हा माजिस्त्रेटांनीं साध्या कैदेची व दंडाची शिक्षा केली होती. सेशन कोर्टात ही शिक्षा रद्द होऊन आरोपी निर्दोषी झाला.

मि० हशमत अल्ली अब्बाची यांस आफिशिएटींग ए० असि० कमिशनर वर्ग ५ नेमलें आणि त्यांची बदली औरंगाबाद छावणींत केली असून त्यांच्या कोर्टाचा अधिकार असि० कमिशनर वर्ग २ असून ५०० रुपया पर्यंतचा स्मालकाजचाही अधिकार देण्यांत आला आहे.

हायर लोअरची परीक्षा गेल्या मार्च महिन्यांत झाली होती तिचा निकाल खालील प्रमाणें:—

| मि० | हुद्दा | विषय व स्टांडर्ड |
|---|---|---|
| शिवराव देवराव | ना० तह० | संपूर्ण लो० |
| सोराबजी शापूरजी | „ | संपूर्ण. |
| माधव गणेश | डिपुटी क्लार्क | संपूर्ण. |
| ए. सी. करी | असि० कमि० | मुलकी लो० |
| एस. झेड बीलग्रामी | अनररी अब्बाची | फौजदारी व मुलकी हा० |
| एस. एच किंग | ए. अ. क. | फौजदारी हा. |
| जे. आर. एडवर्डस | ए. अ. क. | फौजदारी व मुलकी हा० |
| माधवराव अण्णाराव | तहाशिलदार अकोट | लो० |
| महमद असफ अल्लीखान | तहाशिलदार | मराठी |

आज आकोटास रा. रा. देवराव जयकृष्ण व विनायक आप्पाजी काणे यांच्या व्यवस्थे खालीं दुष्काळ-फंडाची तालुका कमिटी नेमण्यांत येणार आहे. आकोट तालुक्यांत वर्गणी ३५०० रुपयांवर जमली आहे. वरील उभय गृहस्थ अन्नदानाचें सत्कार्य लोकांच्या मनांत बिंबवून त्यांच्या प्रवृत्ती धर्मादाय-फंडाकडे वर्गणी देण्याला वळवण्यास फार श्रम घेतात हें त्यांस श्रेयस्कर आहे. ज्या लोकांस अन्नदारीमुळें किंवा अशाच दुसऱ्या कारणामुळें सरकारी कामाचा फायदा करून घेतां येत नाहीं त्यांस मदत करण्यास प्रारंभ तेल्हाऱ्यास प्रथम झाला आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

रा. रा. नारायण रामराव गुप्ते क्लार्क आफ कोर्ट वाशिम यांस अर्धांगवायूच्या विकृती मुळें तीन महिन्यांची रजा घ्यावी लागली. आणि या रजेंत रा. रा. माधव गणेश व रा. रा. चिंतामण विष्णु चितळे यांस अनुक्रमें क्लार्क आफ कोर्ट व डिपुटी क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आलें.

पुसदचे हेडकानस्टेबल मि. अबदुल वहाब यांस चोरानें फार मारलें व त्या इजेनें ते अखेर मरण पावले

हास्पिटल असिस्टंट तयार करण्या साठीं दराबादेस जी शाळा आहे तेथें ६ विद्यार्थ्यांच्या जागा खाली आहेत तेव्हां त्या भरण्या साठीं होतकरू उमेदवारांचीं परीक्षा उमरावतीस किंवा चंद्रघाटास येत्या १७ वे तारखेस होणार आहेत. उमेदवारांची लायकी परीक्षेचे विषय आणि चाकरीच्या अटी यांचा खुलासा गेल्या रेसिडेन्सीमध्यें केला आहे.

गेल्या फेब्रुवारी महिन्यांत या प्रांतीं १०३६३ मनुष्यें जन्मलीं आणि ५००२ मनुष्यें मरण पावलीं.

रा. रा- नारायण राघवेंद्र, क्लार्क आफ कोर्ट, स्मालकाज कचेरी, आकोला यांची बढती बुलढाण्यास डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं झाली हें कळविण्यास आनंद वाटतो. आणि त्यांच्या जागीं रा. रा. गणेश वासुदेव निमकर, डिपुटी क्लार्क यवतमाळ यांची नेमणूक झाली.

---

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९१ रुपये |
| जवारी | ९६ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ६॥ मण |
| सोनें | २६॥ तोळा |
| चांदी | ८५ |

---

NOTICE

There are 2 Cornish and one Lancashire Boilers and one Gin Engine belonging to The Akola Native Cotton G. P. & S. Company for sale. Those who wish to buy are requested to have a look at the articles. Prices will be settled after the approval of the articls.

Deorao Vinayak
Chairman
Board of Directors.

नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, धी अकोलें नेटिव्ह, कॉटन. जिनिंग प्रेसिंग आणि स्पीनिंग कंपनीतील कर्नीश बॉयलर नग २, ल्यांकेशायर बॉयलर नग व जिन इंजिन नग १ असें एकंदर ४ नग विकावयाचे आहेत. तर ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू कारखान्यांत स्वतः येऊन माल पाहून पसंत करावा. पसंत पडल्यास योग्य किंमत ठरविण्यात येईल.

देवराव विनायक
चेअरमन बोर्ड आफ डायरेक्टर्स.

---

## वर्तमानसार.

प्रोफेसर हफकिन यांणीं मुंबई शहरची अमूल्य सेवा केली. ह्मणून त्यांना दरमहा दोन हजार रु० पगार देण्याचें सरकारनें मंजूर केलें आहे.

तिरूर येथें कॉलेरा सुरूं असल्या कारणानें तेथील रहिवाशी भिऊन कालिकत येथें येत आहेत.

डायमंड ज्युबिलीच्या वेळीं नवीन नाणें पाडण्यात येणार आहे. तें येत्या जून महिन्यांत प्रसिद्ध होईल.

मिसिसिपी नदीला पूर आल्यामुळें पांच कोटी डालरांचें कापसाच्या पिकाचें नुकसान झालें.

तुर्किश सैन्यानें ग्रीक लोकांवर हल्ला करून ४०० लोकांची दाणादाण करून सोडिली.

गेल्या सपटेंबर पासून तों ता. ९ एप्रिल पर्यंत मुंबईत चालू रोगानें ११९४६ केसीस पैकीं ९४५९ मृत्यु, कराचीस ३४४६ केसीस पैकीं २९८८ मृत्यु, व पुणें येथें ३१२९ पैकीं १४९० मृत्यु झाले.

अहमदाबाद व प्रांतिज ह्यांच्या दरम्यान रेलवेचें काम पुरें झालें अहमदाबाद व तळद यांच्या दरम्यान मेच्या ता. १ पासून व्यापार सुरू होईल, व पाऊस पडण्याच्या सुमाराला प्रांतिज पर्यंत व्यापार सुरू होईल.

प्रोफेसर बील्ली ह्यांनीं हिंदुस्थानांतल्या दुष्काळा विषयीं निबंध लिहिला आहे कीं, पाऊस न पडणें हें दुष्काळाचें खरें कारण नव्हे आहे. तर, लोकांची गरीबी— लोकांचें दारिद्र्य हें दुष्काळाचें खरें कारण आहे. कां कीं, एखादे वर्षी पाऊस न पडला. तर लोकांची लागलीच उपासमार व्हावी, हा परिणाम त्यांच्या दारिद्र्याचा आहे. आणि लोकांस दारिद्र्य आलें आहे, तें देशांतला पैसा परदेशांत जाण्यास कारण इंग्लिश राज्य आहे. ह्मणून, परंपरया, हिंदुस्थानांतल्या दुष्काळाचें खरें कारण इंग्लिश सरकारचा अंमल आहे. हें कांहीं खोटें नव्हे.

हिंदुस्थानांत दुष्काळ पडतात, त्यांस कारण अवर्षण नव्हे, तर, त्या देशांतला पैसा नदीच्या प्रवाहा प्रमाणें बाहेर जाऊन लोक दरिद्री झाले आहेत, हें खरें कारण आहे, असें आतां विलायतचे लोक कबूल करूं लागले आहेत. आणि शेट दादाभाई नौरोजी इत्यादि आमच्या मंडळींचें ह्मणणें तेंच आहे. पाऊस पडला नाहीं, कीं लोकांचा धीर सुटतो, ते घाबरतात, कां कीं, त्यांच्या संग्रहीं पैसा नसतो. ही स्थिती नाहींशी करायास, शेतकऱ्यांवरच्या आणि इतरांवरच्या कराचें बोजे कमी केले पाहिजेत. हें जर चांगल्या प्रकारें आमच्या देशांतल्या सार्वभौमांच्या मनांत भरेल, तर त्यापासून पुष्कळ उपयोग होणार आहे. इं. प्र.

जपानच्या ४०० लोकांस हवाई बेटांत उतरण्यास हवाईसरकारानें हरकत केली त्यावरून जपानानें आपलें लढाऊ आरमार तिकडे पाठविलें आहे व त्या प्रमाणें अमेरिकेनही आपलें एक आरमार पाठविलें आहे.

कोरिया सरकारानें आपल्या तरुण व होतकरू अशा ३० लोकांस रशियांत पाठवून रशियन भाषा व कलाकौशल्य शिकवून आणण्यांचा बेत केला आहे.

क्रीट प्रकरण— ग्रीसचे लोक सरहद्द वलांडून आले व टर्कीच्या फौजेनें त्यांस जंगलांत गांठून वेढा दिला व ता. ९ रोजीं सकाळीं लढाई सुरूं झाली. ग्रीसची पगारी फौज अजून यांत शिरली नव्हती. टर्कीची सर्व फौज तयार असून रिझर्व फौजही तयार आहे. ग्रीकच्या हद्दींत २,००० फौज शिरली असून त्यांत इटालींतले व्हालंटियर आहेत. लढाई चालूं आहे. सरहद्द वलांडून आलेल्या दंगेखोरांत ग्रीकचे लढाऊ शिपायी आहेत असें आढळतें. टर्कीची फौज त्यांच्यावर हल्ला करणार आहे. मुसलमानांनीं आश्रय केलेल्या परराष्ट्राच्या गलबतावर क्रीटच्या बंडखोरांनीं गोळ्या घातल्या. या क्रीट प्रकरणाचा लवकर निकाल लावण्या बद्दल टर्कीनें बड्या राज्यास तगादा लावला आहे. ग्रीक फौजेनें टर्कीच्या तीन चौक्या घेऊन त्याचा विध्वंस केला. ग्रीक सरकारानें सक्तीचा हुकूम पाठवून लढाई बंद केली. ग्रीकचा एक आफिसर व एक सार्जन्ट असे मेले. ग्रीसची आगळीक आहे हें ध्यानांत ठेवा असें टर्कीनें बड्या राज्यांस कळविलें आहे. सरहद्दीवर दंगा करणाऱ्या ग्रीक लोकांत ग्रीकचे रेग्युलर शिपाई असून ऑफीसरही आहेत असें टर्कीचें ह्मणणें आहे. यांत ग्रीकचे ६३ मेले व टर्कीचे २ मरून १२ घायाळ झाले. ग्रीक बंडवाले रात्रीं हल्ला करितात व टर्की लोक त्यांस जुमानीत नाहींत. या सरहद्दीवरच्या लढाईत टर्की व ग्रीस हे दोघेही आपापला जय झाला असें ह्मणतात. ग्रीक व टर्की यांची सरहद्दीवर कडक लढाई होऊन त्यांत ग्रीकचा मोड झाला व पळ काढावा लागला. ग्रीसची फौज व आरमार यांच्या खर्चा करितां २,३०,००,००० ग्रीस नाणें पाहिजे आहे असें ह्मणणें आहे. ग्रीसनें सरहद्दीवर आतां फिरून कांहीं गडबड केल्यास त्यांच्यावर एकदम चाल करून जाण्याचा टर्कीनें ठराव केला असें सांगतात.

ठरल्या प्रमाणें मुंबईस असणारा पराशियाचा राजकीय वकील निझामाच्या बलावण्यावरून हैदराबादेस गेला व तेथें त्याचा चांगला थाटमाट झाला. परस्परांची बोलणी ऐकण्यास बरोबर कोणी इंग्रज पोलिटिकल आफिसर असेलच!

निझामाची जी कन्टजन्ट फौज आहे तिच्या तर्फे राणीसाहेबांच्या महोत्सवांत हजर राहण्या करितां त्या फौजेंतले आफीसर क्यापटन मीर हाशिम अली हे मुंबईस येऊन विलायतेस गेले असें सांगतात.

प्राविडेन्ट फंडांत भरलेल्या रकमेवर फंड भरणारा मयत झाल्यावर त्याच्या धनकोचा हुकूमनामा चालूं नये असा हाय कोर्टानें नुकताच एक ठराव केला आहे.

एक अपूर्व मुलगी—थोंगाल इ. मद्रास या गांवांत एक मुलगी आहे. तिचें हल्लीं वय २३ वर्षांचें आहे. हिला आपल्या ११ व्या वर्षी एक दुखणें आलें. त्यांत ही दोनचार दिवस अंथरुणास खिळून पडलेली होती. व ती त्यांतून बरी झाली तेव्हां तीची भूक व तहान एकदम बंद झाली. तेव्हां पासून ती कांहीं एक खात नाहीं, व पाणीही पीत नाहीं. असें झाल्यापासून तिनें आपले बापाचें घर सोडलें व रानामध्यें एक मातीचें खोपट करून राहिली आहे. तिनें तामिल भाषेचा अभ्यास करून या भाषेसंबंधीं धर्मपुस्तकें वगैरे वांचून ती आपलें कालक्रमण करिते. सारा दिवस ती एका जागेवर बसून असते व फक्त स्नान करण्या करिता मात्र बाहेरच्या विहिरीवर एक वेळ येते. तिचा अन्नपाण्याचा व्यवहार बंद झाल्यामुळें अर्थात मलमुत्राची पीडा तिला बिलकूल होत नाहीं. आसपासचे लोक तिला देवा प्रमाणें मानून तिची पूजा वगैरे करितात. हिच्या विषयीं पुष्कळ चमत्कारिक गोष्टी आहेत त्यांत एक गोष्ट अशी आहे, एखाद्या मनुष्यास ती आंघोळ करून आंग न पुसतां आपल्या समोर येण्यास सांगते व आपल्या हातानें त्याच्या आंगास विभूती चोळते. तेणे करून त्याचें आंग इतकें कठीण होतें कीं, त्यावर शस्त्राचे घाव घातले अथवा टोचले असतां तें कापलें व टोचलें जात नाहीं असें असून आपल्या आंगीं कांहीं अद्भूत गूण अगर शक्ती आहे अशाबद्दल तिला बिलकूल अभिमान नाहीं तिच्या झोपडींत लोकानीं दिलेले अनेक पदार्थ पडलेले असतात त्यांत कित्येक तर अमोलिक असूनही ते नेण्याची कोणास इच्छाही होत नाहीं. अशी एकंदर हकीकत मि. शंकर सोविया मद्रास डी कोर्टातील एक वकील यांनीं खात्रीनें दिली आहे. या विषयीं विशेष खात्री इच्छिणारानें त्यांच्याशीं पत्रव्यवहार करावा. कारण त्यांचा व त्या मुलीचा गांव एकच आहे.

लाहोरास 'रतन चंदना तलाव' नांवाचें एक मोठें तळें आहे त्यांत स्नान केलें असतां केडू खरूज वगैरे कातडीचे रोग जातात. आणि पटकी झालेल्या मनुष्यास त्या पाण्याचा एक घोट प्यावयास दिला असतां जुलाब बंद होतात.

घशात कांहीं अडकले तर कानांत फुंक मारावी ह्मणजे अडकलेला पदार्थ खाली येतो. टा० अ०

एका शास्त्रज्ञानें एक शोध लाविला, त्याचें असेंही ह्मणणें आहे कीं एक गोणभर साखर जर उन्हांत दोन तास ठेविली, तर तिच्या पासून एका लहानशा मांडवांत दोनतास चांगला उजेड पडेल.

कलकत्याकडे पटकीचा उपद्रव फार जोरानें चालू आहे. कलकत्याच्या भोवतालच्या वाड्या व इतर गांव ह्यामध्यें पटकीचा उपद्रव फार भयंकर आहे. 'एक बलपूर' नांवाच्या गांवीं एका कुटुंबांत ८ माणसें एकदम एकामागून एक मेलीं, त्यात ४ मुलगे व ३ मुली मिळून ७ भावंडें होतीं. व आठवा त्या मुलांचा बाप होता. हीं आठही माणसें एके दिवशीं मेलीं! ह्या प्रमाणेंच इतर शेंकडो कुटुंबांत ह्या पटकीनें तडाखा उडविला आहे! शु० सु०

हल्लीं चोंहिकडे जी भयंकर ग्रंथिक सन्निपाताची सांथ पसरली आहे ती प्रथम मुंबईस उत्पन्न झाली व तेथून आजू बाजूच्या प्रदेशांत पसरली हें निर्विवाद ठरून चुकलें आहे. परंतु ती मुंबईत कोठून व कशी आली याबद्दल अनेक लोकांच्या अनेक शंका आहेत. त्यांतच मुंबईतील ग्याझेट पत्रांत असा एक पुरावा पुढें आणिला आहे कीं, सिंहस्थाचे यात्रेस गोदावरीस जाण्याकरिता उत्तर हिंदुस्थानांतील हजारों दिगंबर पंथाचे गोसावी गेल्या ऑगष्ट महिन्यांत मुंबईस येऊन राहिले होते. ही मंडळी वाळकेश्वराकडे उघड्या मैदानांत रहात असे व रोज मांडवीमध्यें भिक्षा मागावयास जात असे. मांडवींतील भाटिये लोक त्यांस दानधर्म करीत ह्मणून यांचा सांसर्ग मांडवींत विशेष असे ह्या गोसावी मंडळींत बहुतेक मंडळी हिमालया जवळील गुऱ्हवाल येथून आलेली होती ह्या रोगाचें उत्पत्तिस्थान हिंदुस्थानांत हिमालयाच्या पायथ्याशीं कुमाऊं व गुऱ्हवाल या ठिकाणींच आहे व येथें हा ग्रंथिक सन्निपाताचा रोग नेहमीं चालू असतो अशी तिकडील माहिती आहे तेव्हां त्या भागांतील लोक इकडे आल्यानें त्यांच्या संसर्गापासून मांडवींत हा रोग सुरूं झाला आहे. ग्याझेटकारांनीं हा आणलेला पुरावा सकृद्दर्शनीं खरासा वाटतो; पण ते गोसावी मुंबईहून गोदावरीस गेले व तेथें हजारों लोकांशीं त्यांचा संसर्ग घडला असतांही तिकडे कोणासच हा रोग कां झाला नाहीं? याचा विचार करूं लागले ह्मणजे ही कोटी समाधानकारक वाटत नाहीं.

आलिबागेस ग्रंथिक तापाची सांथ ज्यारीनें चालू आहे.

सोलापूर येथील व्हिलेज डोल मधील बायकांस दुष्काळ फंडाच्या रकमेंतून लुगडीं वाटण्यांत आलीं.

अक्कलकोटास वाघ्याचा उपद्रव फार जोरानें वाढत चालला आहे. हजारो लोक गांव सोडून जात आहेत. स. वि.

प्रोफेसर गोखले यांची साक्ष परवा कमिशनरपुढें झाली. ती समाधानकारक झाली व त्यांची फार वहावा झाली अशी तारेनें बातमी आली आहे, ती कळविण्यास आह्मास फार संतोष होतो असें ज्ञानप्रकाशकार ह्मणतात.

मेळा भरणार— या वर्षी सर्व देशभर दुष्काळ व सांथीच्या तापाचा प्रळय माजला असल्यानें जागजागच्या यात्रा बंद करण्यांत आल्या आहेत. त्यावरून यंदाचा श्री क्षेत्र उज्जेन येथील सिंहस्थाचा मेळाही बंद होईल असें वाटलें होतें व त्याप्रमाणें सर्वत्र नकवदी ही झाली होती. शिंदेकरांनीं बैरागी वगैरे लोकांस न येऊं देण्याबद्दल व्यवस्था केली होती. पण तिकडून आलेल्या बातमी वरून असें कळतें कीं सुमारें १०००० बैरागी इंग्रज सरकारच्या व सिंदे सरकारच्या बंदोबस्तास मुळींच न जुमानतां जिवावर उदार होऊन उज्जनीस येऊन दाखल झाले व आणखी ही येतील असें सांगतात. यावरून इतर यात्रांप्रमाणें उज्जनीचा मेळा बंद होईलसें दिसत नाहीं. ही पर्वणी १२ वर्षांनीं एकदां येत असते.

पोरांच्या गळ्यांत चिठ्या— जंगलांत चरणाऱ्या गुरां च्या गळ्यांत नंबराच्या चिठ्या बांधण्याची जशी पद्धत आहे, त्या प्रमाणें पंजाबांतील रिलीफवर्क्सचे कामावर असलेल्या बायकांची ७१८ शे पोरें ज्याला त्याला ओळखतां यावी ह्मणून एकेक नंबरची चिठ्ठी मुलांच्या गळ्यांत व दुसरी आयांपाशीं याप्रमाणें देण्याची व्यवस्था तेथील अधिकाऱ्यांनीं केली. न्या. सु.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.